पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १९२ ■ रविवार, दि. १८ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# विजय अग्रवाल, आशिष पवित्रकार, निलेश देव, उषा विरक यांना संधी...!

## ▶▶ भाजप व काँग्रेसला समान संधी ▶▶ सत्ता कोण स्थापन करणार याकडे सर्वांचे लक्ष






प्रतिनिधी १८ जानेवारी

**अकोला:** अकोला महापालिकेच्या सत्ता स्थापनेत दोन नगरसेवक हे गेमचेंजर म्हणून समोर आले आहे. हे दोन नगरसेवक जिथे असतील तिथे सत्ता असेल. त्यामुळे त्या नगरसेवकांना कुठले पद मिळते हे पाहण्यासारखे असेल.

अपक्ष नगरसेवक आशिष पवित्रकार आणि शिवसेना शिंदे गटाच्या ज्येष्ठ नेत्या व पक्षाच्या एकमेव नगरसेविका उषा विरक यांच्यावर सर्वांच्या नजरा खिळल्या आहे. भाजप नेते विजय अग्रवाल यांना जितकी महापौर पदाची संधी आहे तितकीच ती अपक्ष नगरसेवक आशिष पवित्रकार यांना देखील आहे. त्याच प्रमाणे तशी संधी ही उषा विरक यांना देखील आहे. इतकेच नाही तर भाजप विरोधक सर्व नगरसेवकांनी पाठिंबा दिला तर वंचितचे निलेश देव यांना देखील महापौर पदाची संधी आहे. आता अकोल्यात सत्ता कोणाची स्थापन होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

केंद्रात सत्ता, राज्यात सत्ता यामुळे भाजप सत्ता स्थापन करण्यास इच्छूक आहे. भाजपची सत्ता अकोल्यात आली तर राज्य आणि केंद्रातील सत्तेचा फायदा अकोलेकरांना देखील होईल. पण, हे होत असताना विरोधक मात्र शांत बसलेले नाहीत. त्यांनी देखील मोठा कसोशीने प्रयत्न सुरु केले आहे. विरोधकांची मुठ एकवटली तर भाजप ला विरोधात बसण्याची वेळ येईल. तशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी भाजपचे तिकिट मिळून देखील अकोल्यातील पक्षश्रेष्ठींनी डावलेले अपक्ष नगरसेवक आशिष पवित्रकार यांची भूमिका निर्णायक राहील.

इतकेच नाही तर शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या उषा विरक यांचा कौल कोणाला मिळतो त्याचे महापौर पद निश्चित होईल.

सध्या महापालिकेत सत्ता स्थापनेच्या दृष्टीने घडमोडी सुरू आहेत, परंतु महापौर पदाचे आरक्षण निश्चीत होईपर्यंत वाट पहावी लागणार आहे.

### महापौर पदाबरोबर स्थायी समिती सभापती पद महत्वाचे

महापौर पदाबरोबर स्थायी समिती सभापती पद हे अंत्यंत महत्वाचे पद आहे. महापौर पदाला प्रतिष्ठेचे तर स्थायी समिती सभापती पदाला हे प्रशासनातील महत्वाचे पद म्हणून पाहता येते. महापालिकेचे बजेट मंजुरी पासून तर धोरणात्मक निर्णय हे स्थायी समितीत घेतले जातात. त्यामुळे स्थायी समिती सभापती पदावर देखील राजकीय पक्षांच्या नेत्यांचे लक्ष राहील. अकोल्यात सत्ता कोणाची होते याकडे सर्वांचे लक्ष असून त्यानंतर इतर पदांचा निर्णय होईल.



### महापौर आरक्षण कळीचा मुद्दा

महापालिका सत्ता स्थापनेत महापौर पदाचे आरक्षण हा कळीचा मुद्दा राहणार आहे. संपुर्ण रोस्टर नव्याने निघणार असून त्यानंतर अकोला महापालिकेत सत्ता कोणाची याचा अंतिम निर्णय होईल. खुला प्रवर्ग, एस सी, एस टी आणि ओबीसी या पैकी एका प्रवर्गासाठी आरक्षण निघू शकते. भाजप आणि काँग्रेस दोन्ही पक्ष सत्ता स्थापनेसाठी कसोशीने प्रयत्न करत आहे. त्यामुळे सत्ता स्थापनेच्या या प्रयत्नात महापौर पदाचे आरक्षण काय निघते हे महत्वाचे ठरणार आहे. सोमवारी राजपत्रात नगरसेवकांचे प्रकाशन झाल्यानंतर बुधवार किंवा गुरुवारी महापौर पदाचे आरक्षण घोषित होईल. जानेवारी अखेर किंवा फेब्रुवारी च्या पहिल्या आठवड्यात महापौर इलेक्शन लागण्याची शक्यता राजकीय गोटातून व्यक्त केली जात आहे.

### भाजपची सत्ता नको म्हणून.....

काँग्रेस, शिवसेना यांना सत्तेत काही नको. या दोन्ही पक्षांना अकोला महापालिकेत भाजप विरोधी सत्ता पाहिजे. तरच त्यांच्या प्रभागातील कामे होतील. इतर विकास कामांचा निधी मिळेल. त्यामुळे सत्ता स्थापन करण्यासाठी पडद्यामागून मोठ्या घडामोडींना वेग आला आहे. अकोल्यात कोणाची सत्ता स्थापन होते याकडे सर्वांचे लक्ष असून त्या दृष्टीने सर्वच राजकीय पक्षाचे बडे नेते कामाला लागल्याची माहिती आहे.

# रोशन भजनकर बिग बॉसमध्ये कसे आले ?

## हमाल ते बिग बॉस मराठीपर्यंतचा रोशन भजनकरचा संघर्षमय प्रवास

**अकोला / अमरावती:** बिग बॉस मराठीचा सहावा सीझन सुरू होऊन पहिल्याच दिवसापासून घरात रोमांचक घडामोडी घडत आहेत. स्पर्धकांमध्ये तीव्र चर्चा, जोरदार वाद आणि कधी कधी भांडणंही रंगत आहेत. या सर्वांमध्ये विदर्भातील अमरावतीचा रहिवासी रोशन भजनकर याची कहाणी खूपच वेगळी आणि प्रेरणादायी आहे. आर आर सी न्यूजच्या आर जे अंजिक्य यांच्या सोबतच्या पॉडकॉस्ट मध्ये त्यांची संपुर्ण मुलाखत महाराष्ट्रातील जनतेला पाहता येईल.



रोशन हा व्यावसायिक हमाल म्हणून काम करतो. त्याचबरोबर तो एक उत्कृष्ट बॉडीबिल्डर असून सोशल मीडियावर इन्फ्लुएन्सर म्हणूनही चांगली ओळख निर्माण केली आहे. बिग बॉस या मंचावर त्याने आपल्या आयुष्यातील संघर्षमय पण अत्यंत प्रेरणादायी प्रेमकथा शेअर केली आहे, जी सर्वांच्या मनात घर करून गेली आहे. रोशनचा बिग बॉसपर्यंतचा प्रवास खूपच प्रेरक आहे. सुरुवातीला त्याची निवड झाली नव्हती. तब्येत बिघडल्यामुळे त्याला पहिल्या फेरीतच नकार मिळाला होता. पण येथे थांबायचे नव्हते. बिग बॉस टीमने त्याला २० दिवसांचा वेळ दिला. या कालावधीत रोशनने अथक मेहनत केली. नियमित व्यायाम, योग्य आहार आणि पूर्ण निर्धाराने त्याने आपली बॉडी पुन्हा उत्तम आकारात आणली. दुसऱ्या संधीत त्याने परीक्षकांना प्रभावित केले आणि अखेर बिग बॉस मराठीच्या घरात स्थान मिळवले. सोशल मीडियावरून त्याच्या या संपूर्ण प्रवासाचा एक व्हिडिओ सध्या खूप व्हायरल होत आहे. या व्हिडिओतून रोशनच्या जिद्दीचे, मेहनतीचे आणि धैर्याचे दर्शन घडते. एक साधा हमाल, जो स्वप्नांना पंख देऊन मोठ्या व्यासपीठापर्यंत पोहोचला, याचं हे खरे उदाहरण आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोसकडे रवाना

**मुंबई :** महाराष्ट्राला १ लाख कोटी डॉलर अर्थव्यवस्थेकडे नेण्याचा वेग अधिक वाढवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जागतिक गुंतवणूक परिषद( वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम) मध्ये सहभागी होण्यासाठी दावोस, स्वित्झर्लंडकडे रवाना झाले आहेत. या परिषदेसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमवेत उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

## मुंबई पालिकेत १० नगरेसवक वाढणार!

प्रतिनिधी १८ जानेवारी

**मुंबई :** आशियातील सर्वात श्रीमंत महापालिका असलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या आगामी कार्यकाळात एक अभूतपूर्व बदल पाहायला मिळणार आहे. महापालिकेच्या नव्या सभागृहात प्रथमच ५ ऐवजी १० नामनिर्देशित नगरसेवकांची नियुक्ती केली जाणार आहे. या निर्णयामुळे महापालिकेतील राजकीय पक्षांच्या ताकदीत मोठी भर पडणार आहे. याचा सर्वाधिक फायदा विशेषतः भाजपला होण्याची चिन्हे आहेत.

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मध्ये मार्च २०२३ मध्ये राज्य सरकारने महत्त्वपूर्ण दुरुस्ती केली. या नव्या तरतुदीनुसार, कोणत्याही महानगरपालिकेत निवडून आलेल्या एकूण नगरसेवकांच्या १० टक्के किंवा जास्तीत जास्त १० सदस्यांना नामनिर्देशित करता येते.

# अकोल्यात पराभूत उमेदवारांचा आकांडतांडव

## विकासकामांत खोडा घालण्याच्या पोकळ गर्जना

प्रतिनिधी १८ जानेवारी

**अकोला :** राजकारणात जय-पराजय हा पाचवीलाच पुजलेला असतो, मात्र अकोल्यात सध्या पराभवाचा धक्का पचवणे काही माजी नगरसेवकांना कठीण जात असल्याचे चित्र आहे. निवडणुकीत धुळ चारल्या गेल्यामुळे चवताळलेल्या या 'पडेल' उमेदवारांनी आता थेट जनतेच्या विरोधातच शड्डू ठोकला असून, 'प्रभागात विकासकामे कशी होतात तेच पाहतो,' अशा धमक्या देण्यास सुरुवात केली आहे.




सत्ता स्थापन होण्यापूर्वीच, पराभूत मानसिकतेतून काही माजी नगरसेवकांनी प्रभागातील निधी रोखणे किंवा विकासकामात अडथळा आणण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. 'मी निवडून आलो नाही, तर आता प्रभागात एकही काम होऊ देणार नाही,' अशा त्यांच्या आविर्भावामुळे अकोलेकरांमध्ये संताप व्यक्त होत आहे. मात्र, नागरिकांनी या पोकळ धमक्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले असून, अशा लोकप्रतिनिधींची खरी जागा त्यांना मतपेटीतून दाखवून दिली असल्याची चर्चा आता रंगली आहे.

एकाच प्रभागातील बहुसदस्यीय पद्धतीमुळे (पॅनेल सिस्टम) एकाच पक्षाचे काही उमेदवार जिंकले तर काही पराभूत झाले. या पराभवाचे खापर आता स्वतःच्याच पक्षाच्या विजयी उमेदवारांवर फोडले जात आहे. 'तुमच्यामुळेच माझा पराभव झाला' किंवा 'सोबतच्या उमेदवारांनी साथ दिली नाही' अशी ओरड सध्या शहराच्या राजकीय वर्तुळात ऐकू येत आहे. आपण नेमके का पडलो, याचे आत्मपरीक्षण करण्याऐवजी दुसऱ्यांना दोष देण्यात हे उमेदवार धन्यता मानत आहेत. जनतेला नेमके काय हवे होते आणि त्यांनी कोणाला का नाकारले, हे गुपित अकोलेकरांना चांगलेच ठाऊक आहे. मात्र, पराभवाच्या रागातून शहराच्या विकासाला ओलीस धरणाऱ्या या उमेदवारांच्या वागण्यामुळे त्यांची उरली-सुरली प्रतिमादेखील मलीन होत आहे.

# आ. सत्तार, जिल्हाधिकाऱ्यांसह तीन अधिकाऱ्यांना सिल्लोड न्यायालयाची नोटीस!

प्रतिनिधी १८ जानेवारी

**सिल्लोड :** सिल्लोड सोयगाव विधानसभा निवडणुकीत शिवसेना शिंदेकडून उमेदवार असलेले आमदार अब्दुल सत्तार यांनी प्रचाराच्या शेवटच्या जाहीर सभेत तालुक्यातील मतदारांना उद्देशून धमकीवजा वक्तव्य केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. त्यांच्या भाषणात, जे मतदार त्यांना मतदान करणार नाहीत त्यांची नावे गुप्तपणे चिठ्ठीद्वारे कळविण्याचे आवाहन करत, अशा मतदारांवर 'रामबाण उपाय' करण्याची भाषा वापरून गोळ्या देणे, इंजेक्शन देणे, अँजिओप्लास्टी, अँजिओग्राफी किंवा बायपास शस्त्रक्रियेचा इंतजाम केला जाईल, असे वक्तव्य केल्याचा आरोप आहे.

या कथित धमकीपूर्ण भाषणाविरोधात सामाजिक कार्यकर्ते गणेश शंकरलाल शंकरपेल्ली सी-विजिल ॲपद्वारे तसेच सिल्लोड येथील निवडणूक अधिकारी लतीफ पठाण यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. मात्र, आदर्श आचारसंहिता पथकाचे तत्कालीन प्रमुख दादराव श्रीपत अहिरे यांनी अब्दुल सत्तार यांचा बचाव करून तक्रार फेटाळल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. यानंतर तक्रारदारांनी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्याकडे आक्षेप नोंदवून अपील दाखल केले होते. सुमारे एक वर्ष तक्रारीचा पाठपुरावा करूनही जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस कारवाई किंवा निर्णय घेण्यात आला नसल्याने, अखेर तक्रारदारांनी सिल्लोड न्यायालयात पार्टी इन पर्सन म्हणून खासगी फौजदारी तक्रार दाखल केली आहे.

# मौनी अमावस्येला संगमच्या काठावर गोंधळ

## शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांचा पवित्र स्नानास नकार

वृत्तसंस्था १८ जानेवारी

**प्रयागराज:** शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी प्रयागराज माघ मेळ्यात मौनी अमावस्येला स्नान करण्यास नकार दिला आहे. त्यांनी त्यांची पालखी अर्ध्यातूनच आखाड्यात परत आणली. ते त्यांच्या पालखीतून आखाडा सोडून संगमाकडे जात असताना, उत्तर प्रदेश सरकारचे गृह सचिव मोहित गुप्ता यांनी त्यांच्या शिष्यांना मारहाण केली असल्याची माहिती समोर येत आहे. या सर्व परिस्थितीमुळे त्याठिकाणी गोंधळ वाढला आणि अविमुक्तेश्वरानंद यांनी स्नान करण्यास नकार दिला.



शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या शिष्यांवर हल्ला होत आहे. अधिकारी त्यांना जीवे मारण्याची धमकी देत होते, म्हणून आपण याठिकाणी स्नान करणार नसल्याचे म्हटले. मौनी अमावस्येला प्रयागराजच्या संगम शहरात भाविकांची मोठी गर्दी होत आहे. गर्दी नियंत्रित करण्यासाठी पोलिस दल तैनात आहे. रात्रीपासूनच नियंत्रण कक्षापासून संगम नाक्यापर्यंत पोलिस अधिकारी गस्त घालत आहेत.

मौनी अमावस्येला प्रयागराजच्या संगम शहरात भाविकांची संख्या सातत्याने वाढत आहे. मध्यरात्रीपासूनच मौनी अमावस्येच्या पवित्र प्रसंगी स्नान करण्यासाठी भाविक संगमाकडे जात आहेत. संगम नाक्यावर गर्दी नियंत्रित करण्यासाठी पोलिस आणि पीएसी कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. भाविक एकाच ठिकाणी थांबू नयेत म्हणून पोलिस कर्मचारी शिट्ट्या वाजवत आहेत. संगम नाक्यावर स्नान केल्यानंतर लोकांना सतत पुढे हलवले जात आहे.

प्रशासनाने मौनी अमावस्येला ३ कोटींहून अधिक भाविकांच्या आगमनाचा अंदाज लावला आहे. स्नान घाटांवर जल पोलिस, एनडीआरएफ, एसडीआरएफ, फ्लड कंपनी पीएसी आणि गोताखोर तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय, मेळ्यात पोलिस, पीएसी, आरएएफ, बीडीएस, यूपी एटीएस कमांडो आणि गुप्तचर संस्था तैनात आहेत.

# अपक्ष अन् कमी जागा असलेले पक्षच ठरणार 'किंगमेकर'!

## ▶▶ जादुई आकडा गाठण्यासाठी धावपळ ▶▶ निकालानंतरच खरी परीक्षा

प्रतिनिधी १८ जानेवारी

**अकोला :** आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झाडत महानगरपालिकेची निवडणूक पार पडली. मतमोजणीही झाली. मात्र आता सत्ता स्थापनेसाठी दोन्ही पक्षांची खरी परीक्षा राहणार आहे. जादुई आकडा भाजप व काँग्रेस या दोन्ही मोठ्या पक्षांना गाठता आला नाही. त्यामुळे हा आकडा कसा गाठायचा यासाठी समीकरणं जुळवताना दोन्ही पक्षांची दमछाक होत आहे. या सत्ता समीकरणात अपक्ष आणि एक-एक जागा बळकाविणारे पक्ष हेच खरे किंगमेकर ठरणार असल्याचे चित्र अकोला महानगरपालिकेत दिसून येत आहे. त्यामुळे ते 'हम है यहाँ के सिंकदर' अशी मिजाज त्यांची राहणार आहे.

अकोला महापालिकेत एकूण ८० जागा आहेत. तर बहुमतसाठी ४१ चा आकडा गाठणे महत्त्वाचे आहे. मात्र कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने त्रिशंकू परिस्थिती निर्माण झाली आहे. सध्या सत्तेच्या किल्ल्या दोन अपक्ष आणि शिंदे व शरद पवारांच्या प्रत्येकी एका नगरसेवकांच्या हाती आहेत. ते जिकडे झुकतील त्यांची सत्ता स्थापन होणार असल्याने त्यांनी कमी जागा पटाकावूनही किंमत वाढली आहे.

### महापौर सोडतीकडे लक्ष


वास्तविक पाहता निवडणुकीपूर्वीच महापौर पदाचे आरक्षण निघणे अपेक्षित होते. परंतु सध्या सर्वच बाबतीत चमत्कार घडत असल्याने हे आरक्षण मतमोजणीनंतर निघणे यात काही आश्चर्य वाटायचे कारण नाही. त्यामुळे तूर्त अकोलेकरांचे लक्ष आरक्षणाकडे लागले असून, त्यांना प्रतीक्षा केल्याशिवाय दुसरा पर्याय नाही. नगर विकास विभाग वरिष्ठ पातळीवरून सूचना आल्यानंतर आरक्षण सोडत काढणार असल्याने जानेवारीच्या शेवटी किंवा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्या आरक्षण जाहीर होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

**टार्गेट ४१!**

विशेष म्हणजे दोनपैकी एक अपक्ष भाजपचे बंडखोर आशिष पवित्रकार आहेत. मात्र आपल्यावर भाजपच्या स्थानिक नेतृत्वाने अन्याय केल्याचा आरोप त्यांनी केला असल्याने ते भाजपकडे जाण्याची शक्यता धुसर मानली जात आहे. तसेच पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने निलंबन मागे घेण्याचं आणि तिकीट देण्याचे आदेश दिल्यानंतरही भाजपच्या स्थानिक नेतृत्वाने आपल्याला जाणीवपूर्वक तिकीटापासून डावलल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. म्हणजे वरिष्ठांवर त्यांचा रोष नसल्याने वरिष्ठ स्तरावरून हालचाली झाल्यास ते कधीही आपला विचार बदलू शकतात, याचा सुतोवाच त्यांच्या वक्तव्यातून होतो. त्यामुळे अपक्ष नगरसेवक आशिष पवित्रकार यांची भूमिका काय?, हा कळीचा मुद्दा सत्ता स्थापनेत राहणार आहे. यासोबतच अकोला विकास समितीचा विजयी झालेला १ नगरसेवक यालासुद्धा भाजप सोबत घेण्याचा प्रयत्न करते आहे. त्यामुळे भाजपचे ३८ आणि मित्रपक्ष शिंदे आणि अजित पवार यांसह २ अपक्ष असे ४२ चे संख्याबळ भाजप जमवू शकते. काँग्रेसचे २१ नगरसेवक विजयी झाले आहेत. यासोबतच ठाकरे गटाचे ६, शरद पवार गटाचे ३, वंचितचे ५, एमआयएमचे ३ यासोबतच काँग्रेस अजित पवारांचा १ आणि आशिष पलित्रकारांसह दुसरा अपक्ष नगरसेवक सोबत घेण्याचे प्रयत्न करीत आहे. हा आकडा ४१ होतो आहे. भाजपचे बंडखोर आशिष पवित्रकार यांना काँग्रेसकडून मोठ्या पदाची ऑफर देऊन त्यांना आपल्याकडे घेण्याची शक्यताही नाकारता येत नाही. त्यामुळे काँग्रेसही सत्ता समीकरण जुळविण्यासाठी धावपळ करताना दिसून येत आहे.

शेवटी दोन्ही मोठ्या पक्षांना अपक्षांच्या दारी जाण्याशिवाय पर्याय नाही. ते ज्या पारड्यात आपले वजन टाकतील त्यांची सत्ता स्थापन होणार आहे. मात्र दोन्ही पक्षांना त्यांच्या अपेक्षा पूर्ण कराव्या लागतील, एवढे मात्र निश्चित.

# मुंबई मॅरेथॉनचा विजेता ठरला ताडू अबाते डेमे!




प्रतिनिधी १८ जानेवारी

**मुंबई :** आशिया खंडातील सर्वांत मोठी मॅरेथॉन आणि जगभरातील धावपटूंना आकर्षण असलेली 'टाटा मुंबई मॅरेथॉन' रविवार पार पडली. आज (रविवार, १८ जानेवारी) पहाटे ०५.०५ ते दुपारी १.३० वाजेपर्यंत ही मॅरेथॉन स्पर्धा भरविण्यात आली. या स्पर्धेत इथिओपियाचा लांब पल्ल्याचा धावपटू ताडू अबाते डेमे याने उत्कृष्ट कामगिरी करत आंतरराष्ट्रीय एलिट पुरुषाचा किताब जिंकला आहे. त्याला बक्षीस म्हणून तब्बल ४५ लाख रुपये मिळाले आहेत.

सीएसएमटी-हुतात्मा चौक-चर्चगेट-मरिन ड्राइव्ह-पेडर रोड-हाजी अली-वांद्रे वरळी सी-लिंक-माहीम- प्रभादेवी-हाजी अली ते सीएसएमटी असा या स्पर्धेचा मुख्य मार्ग आहे.

CMYK

# नांदुऱ्यात घरफोडी; दागिने लंपास

**खामगाव :** नांदुरा शहरातील वीर लक्ष्मी नगर परिसरातील एका घरात अज्ञात चोरट्याने दरवाजाचा कडी-कोंडा तोडून घरात प्रवेश केला. कपाटातील रोख रक्कम व सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण २ लाख ५ हजार ९७२ रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना १६ जानेवारी रोजी उघडकीस आली. याप्रकरणी अखिलेश प्रेमेंद्र अंधारे (वय २७, रा. वीर लक्ष्मी नगर, नांदुरा) यांनी नांदुरा पोलिस ठाणे येथे फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, त्यांच्या घरातील कपाटात ठेवलेले आई व मावशी यांचे जुने सोन्या-चांदीचे दागिने (किंमत १,८४,७७२ रुपये), तसेच ९,५०० रुपये रोख रक्कम, असा एकूण २,०५,९७२ रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेला. याप्रकरणी नांदुरा पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३३१ (४) व ३०५ (अ) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप येथे श्री संत गजानन महाराज भव्य महापारायण सोहळा

## ♦ ५००१ भक्तांनी केले एकत्रित सामूहिक महापारायण ♦ गण गण गणात बोते मंत्रोच्चारांनी परिसर भक्तिमय

प्रतिनिधी १८ जानेवारी



**अमरावती:** मकरसंक्रांती व नवीन वर्षाच्या मंगलमय पर्वाचा योग साधत पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप, अमरावती येथे शनिवार, दिनांक १७ जानेवारी २०२६ रोजी श्री. संत गजानन महाराज विजय ग्रंथ महापारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. स्वामी विवेकानंद सभागृहात पार पडलेल्या या सोहळ्यात सुमारे ५००१ भक्तांनी सामूहिक पारायण करून परिसर भक्तीमय केला.

गण गण गणात बोतेङ्ग या जयघोषांनी संपूर्ण सभागृह दुमदुमून गेले.

सोहळ्याची सुरुवात श्री संत गजानन महाराजांच्या पालखी मिरवणुकीने झाली. पालखी व श्रींचे विधिवत पूजन संस्थेचे अध्यक्ष मा. आ. श्री प्रवीण पोटे पाटील, सौ. अनुराधाताई प्रवीण पोटे पाटील तसेच उपाध्यक्ष श्रेयसदादा पोटे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

श्री गजानन स्वामी चरित, जो नियमे वाचिल सत्य, त्याचे पुरतील मनोरथङ्ग या भावनेतून अमरावती शहरासह जिल्ह्यातील गजानन महाराजांचे हजारो भक्त तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने या पारायण सोहळ्यात सहभागी झाले. मुंबई येथील मुखोद्गत वाचक ङसौ. विद्याताई पडवळङ यांनी सुमधुर वाणीने महाराजांना पारायणासाठी आवाहन केले. त्यानंतर गजानन विजय ग्रंथाच्या पारायणास प्रारंभ झाला. प्रत्येक अध्यायानंतर त्यांनी अनुभवकथनातून महाराजांची महती सांगत उपस्थित भक्तांना भावनिक व आध्यात्मिक अनुभूती दिली.

पारायणाच्या प्रारंभी सर्व भक्तांना गजानन विजय ग्रंथाचे वितरण करण्यात आले. तसेच सोहळ्यादरम्यान नाश्ता, चहा व पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था आयोजकांच्या वतीने सेवेकऱ्यांमार्फत करण्यात आली.

एकवीस अध्यायांच्या पारायणानंतर भक्तिमय वातावरणात उपासनेची सांगता झाली. यावेळी महाराजांची आरती, मंत्रपुष्पांजली, बावन्नी, अष्टक तसेच एकवीस नमस्कारांचे सामूहिक पठण करण्यात आले. त्यानंतर उपस्थित सर्व भक्तांसाठी महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले. संपूर्ण सोहळा श्रद्धा, भक्ती व शिस्तबद्ध नियोजनाने पार पडला. या यशस्वी आयोजनासाठी पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# नागपूरमार्गे जाणाऱ्या बोलेरोने दुचाकीला मागून धडक, दोघे युवक गंभीर

प्रतिनिधी १८ जानेवारी



**अमरावती :** तिवसा शहरापासून काही अंतरावर असलेल्या वणी फाटा परिसरात शनिवारी दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास कार व दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील दोघे युवक गंभीर जखमी झाले. ही घटना १७ जानेवारी रोजी घडली.

नागपूरमार्गे जाणारी एम.एच. २७ डी.ई. ४२८२ क्रमांकाची बोलेरो गाडी इंडियन गॅस एजन्सीकडून अमरावती-नागपूर राष्ट्रीय महामार्गाकडे जात होती. दरम्यान, बोलेरो चालकाने एम.एच. २७ बी.आर. ०२२६ क्रमांकाच्या दुचाकीला मागून जोरदार धडक दिली. या धडकेमुळे दुचाकी रस्त्यालगत फेकली गेली आणि दुचाकीवरील दोघे युवक गंभीर जखमी झाले. या अपघातात वणी येथील रहिवासी दुचाकीचालक श्रीकांत सुधीर देशमुख (वय ३५) आणि मंथन बबन देशमुख (वय २८) हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. अपघातानंतर घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तात्काळ मदतकार्य करत जखमींना तिवसा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच तिवसा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून, या अपघाताची सखोल चौकशी सुरू आहे.

# खोडके दांपत्यांनी केले विजयी उमेदवारांचे स्वागत

प्रतिनिधी १८ जानेवारी



**अमरावती :** प्रभाग क्रमांक -७ जवाहर स्टेडियम प्रभागातील ब ( नागरिकांचा मागास प्रवर्ग ) मधून अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विजयी उमेदवार मनीष बजाज यांनी विजय मिळवल्यानंतर गाडगेनगर स्थित आमदार . सुलभाताईखोडके यांच्या निवास स्थानी जाऊन आमदार - संजय खोडके, आमदा सुलभा खोडके, यश खोडके यांच्याकडून देण्यात आलेल्या शुभेच्छा व अभिनंदनाचा स्वीकार केला.

आमदार - यांच्या नेतृत्वाखाली अमरावती शहराने विकास, पारदर्शकता आणि जनकल्याणाचे अनेक टप्पे गाठले. कणखर नेतृत्व, ठाम निर्धार आणि समर्पित प्रशासन यामुळे प्रभावित होऊन आपण अनेक वर्षांपासून आमदार - सौ. सुलभाताई खोडकेंच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात कार्यरत आहे.कौशल्य, नियोजनबद्ध प्रचारयंत्रणा याबरोबरच भक्कम नेतृत्व आणि सर्वात महत्वाचे म्हणजे सर्व घटकांनी केलेल्या अफाट कष्टांना या विजयाचे श्रेय द्यावे लागेल. खोडके दाम्पत्यांच्या दिशानिर्देश - मार्गदर्शन - नेतृत्वात प्रभाग क्रमांक -७ जवाहर स्टेडियम प्रभागात परिसर विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ध्येय - धोरणाशी सुसंगत विचारधारा, समाजभान, स्वच्छ कारभार, पारदर्शकता या चतु:सूत्रीचा अवलंब करीत आपण विकासात्मक कामांना गतिमान ठेवण्यावर भर देणार आहोत.जय आणि पराजय हा कोणत्याही स्पर्धेतील अटळ असा भाग असतो.परंतु जनता जनार्धनाने दिलेला विजयाचा कौल लक्षात घेता, आपण आमदार - सौ. सुलभाताई खोडकेंच्या नेतृत्वात जवाहर स्टेडियम प्रभागाचा केवळ विकास व्हावा आणि त्याची फळे समान प्रमाणात प्रत्येकास चाखावयास मिळावीत एव्हढीच सामान्य मतदारांची अपेक्षा असताना आपण कार्यक्षम कारभाराला प्राधान्य देऊ. असा विश्वास यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित उमेदवार - मनीष बजाज यांनी व्यक्त केला. याप्रसंगी यश सुलभा संजय खोडके यांच्यासमवेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व सदस्य व पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# अमरावती मनपात अपक्षांचा पूर्ण सफाया; १२० पैकी एकालाही विजय नाही

## ♦ मतदारांचा स्पष्ट संदेश : पक्षीय उमेदवारांनाच पसंती, अपक्षांचा अंदाज फेल

प्रतिनिधी १८ जानेवारी

**अमरावती:** महानगरपालिका निवडणुकीत मतदारांनी अपक्ष उमेदवारांना पूर्णतः नाकारल्याचे स्पष्ट झाले आहे. तब्बल १२० अपक्ष उमेदवार रिंगणात असतानाही एकालाही विजय मिळवता आला नाही.

त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत शहराच्या राजकारणावर पक्षीय राजकारणाचाच वरचष्मा राहिल्याचे चित्र समोर आले आहे.

पालिका सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अपक्ष उमेदवारांना किमान २० ते कमाल दीड हजार मतांपर्यंतच मते मिळाली. महापालिकेच्या २२ प्रभागांमधील ८७ जागांसाठी ही निवडणूक पार पडली. काही प्रभागांमध्ये चुरशीची लढत होईल आणि अपक्षांनाही काही जागा मिळतील, असा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र प्रत्यक्ष निकालाने हा अंदाज पूर्णतः फोल ठरवला.

माघार घेण्याच्या अंतिम दिवसापर्यंत एकूण ६६१ उमेदवारांनी आपली उमेदवारी कायम ठेवली होती. यामध्ये ५४२ उमेदवार विविध राजकीय पक्षांचे होते, तर १२० उमेदवार अपक्ष म्हणून निवडणूक रिंगणात उतरले होते. मात्र या १२० अपक्षांपैकी एकाही उमेदवाराला मतदारांचा कौल मिळू शकला नाही.

मतदारांनी अपक्ष उमेदवारांना नाकारण्यामागे काही ठळक कारणे पुढे येत आहेत. अपक्ष उमेदवार निवडून आल्यास भविष्यात 'घोडेबाजार' होण्याची शक्यता, तसेच त्यांना ठोस राजकीय पाठबळ नसल्याने प्रभागाच्या विकासासाठी सत्ताधाऱ्यांकडून पुरेसा निधी मिळणार नाही, अशी धारणा मतदारांमध्ये बळावत आहे. त्यामुळे महापालिका निवडणुकांत अपक्षांविरोधातील कल मागील काही वर्षांपासून अधिक ठळक होत चालला आहे.ष आकडेवारीनुसार, १९९२ मध्ये झालेल्या मनपाच्या पहिल्या निवडणुकीत एक सदस्यीय पद्धतीनुसार तब्बल २८ अपक्ष उमेदवार निवडून आले होते. त्यानंतर १९९७ मध्ये ही संख्या २५ वर आली. २००२ मध्ये ५, २००७ मध्ये ७, २०१२ मध्ये ८, तर २०१७ मध्ये केवळ एकच अपक्ष उमेदवार नगरसेवक म्हणून विजयी झाला होता.

तब्बल नऊ वर्षांनंतर झालेल्या या निवडणुकीत अमरावतीकर मतदारांनी एकाही अपक्ष उमेदवाराला निवडून न देण्याचा ठाम निर्णय घेतल्याचे निकालातून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आगामी काळात शहराच्या राजकारणात पक्षीय समीकरणेच निर्णायक ठरणार असल्याचे संकेत या निकालातून मिळत आहेत.

# वडनेर गंगाई ग्रामपंचायतचा कोंडवाडा बनलाय खताचा अड्डा

## ♦ एकमेकांच्या हेव्या दाव्यामुळे लोकप्रतिनिधी मात्र झोपेत

प्रतिनिधी १८ जानेवारी



**दर्यापूर :** तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणजेच वडनेर गंगाई अतिशय जुनी ग्रामपंचायत राजकीय दृष्ट्या सामाजिक दृष्ट्या पुढारलेली ही ग्रामपंचायत आज मात्र तिची अवस्था अतिशय भयान्व दिसून आली नाल्या पूर्ण भरलेले आहेत एवढेच काय तर गावात कोंडवाडा आहे प्रशस्त जागा आहे देशमुख यांची मात्र त्या जागेमध्ये जनावरांना बांधता त्या ठिकाणी कोंडवाडा नसून खताचा अड्डा झालेला आहे तोंडावरच गेट लागून मोठा खताचा ढीग हा कुठल्या ग्रंथाचा आहे माहित नाही बहुतेकडून तो देशमुखाचाच असेल असे मला वाटते परंतु तसे होऊ शकत नाही मात्र जागा मात्र देशमुखांनी दान दिलेली जागा आहे त्यावेळेस सरपंच म्हणून कारण असलेले सरपंचाने ती जागा दान कोंढवाळा करता मिळून घेतली मात्र आज उजाळा मिळणे अतिशय गरजेचे आहे ग्रामसेवक दर्यापूरला राहतात व तिथून ते वाढलेले गंगांवर लक्ष ठेवतात असे एका रहिवाशांनी सांगितले वडनेर गंगाई गावात फिरलो असताना असे दिसून आले की नाल्या काढण्याला कर्मचारी आहेत किंवा नाही हे सुद्धा तपासणी गरजेचे आहे.

# पुढील दोन दिवस किमान तापमानात किंचित वाढ होईल

**अमरावती :** त्यानंतर १९,२०,२१ किमान तापमान २-३ ष्टने वाढ होण्याची शक्यता आहे. त्यानंतर २३ तारखेपासुन हिमालयावर एकामागोमाग ऐक दोन पश्चिमी विक्षोभ धडकणार आहे. त्यामुळे विदर्भात तापमानाचा पारा पुन्हा घसरण्याची शक्यता आहे. जानेवारी चां शेवटचा आठवडा बहुतेक कडाक्याची थंडी राहण्याची दाट शक्यता आहे

असे मत हवामान तज्ञ प्राध्यापक अनिल बंड यांनी व्यक्त केले. तसेच या पश्चिमी विक्षोभ (चक्राकार वारे) आणि बंगालच्या उपसागरातील परीस्थिती मुळे विदर्भात अरबी समुद्र तसेच बंगालच्या उपसागरातील बाष्पयुक्त वारे येण्याची शक्यता आहे. त्यामुळे अंशतः ढगाळ वातावरण तसेच कुठेकुठे तुरळक स्वरूपात पाऊस पडण्याची शक्यता ऐत नाही. तरी शेतकऱ्यांनी तुर सोंगणीचे वेळापत्रक काळजीपूर्वक आखावे.

> शक्यतोवर २२ ते २५ जानेवारी या कालावधीत तुर कापू नये. तसेच संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी तापमानात वाढ झाल्यास आणि ढगाळ वातावरण निर्माण झाल्यास नवतीवर सायट्रस सायला येणार नाही याकरिता तज्ञांच्या सल्ल्याने उपाययोजना करावी.
>
> **प्रा .अनिल म. बंड**
> श्री शिवाजी कृषी महाविद्यालय अमरावती
> हवामान केंद्र.

# कठोर व सातत्यपूर्ण मेहनत स्पर्धा परीक्षेत यशस्वी करू शकते- वर्षा भाकरे

प्रतिनिधी १८ जानेवारी



**दर्यापूर :** काळ प्रचंड स्पर्धेचा आहे. या स्पर्धेत टिकणे हे फार मोठे आव्हान आहे. त्यासाठी लागते कठोर व सातत्यपूर्ण मेहनत. याची ज्या विद्यार्थ्यांची तयारी आहे त्याला यश नक्की मिळते. म्हणून कठोर व सातत्यपूर्ण मेहनतच स्पर्धा परीक्षेत यशस्वी करू शकते असे प्रतिपादन आपल्या मार्गदर्शनात वर्षा भाकरे, जिल्हा नियोजन अधिकारी अमरावती यांनी केले. त्या श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित जे.डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयात आयोजित स्व. बाबासाहेब सांगळूदकर स्मृती व्याख्यानमालेचे पहिले पुष्प स्पर्धा 'परीक्षा आव्हान व उपाय' या विषयावर गुंफताना बोलत होत्या. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा. प्रभाकरराव कोलखेडे, दुसऱ्या वक्त्या म्हणून स्वाती गुडधे, सहाय्यक निबंधक, मोर्शी तर प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालय विकास व शाळा समितीचे सदस्य डॉ.वसंतराव टाले, शिवाजीराव देशमुख नरेंद्रजी लड्ढा, शेषरावजी काळे, प्राचार्य डॉ. अतुल बोडखे, समन्वयक डॉ.मिलिंद भिलपवार, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक प्रा.राजेश तायडे व्यासपीठावर उपस्थित होते.याप्रसंगी बोलताना दुसऱ्या वक्त्या सहायक निबंधक स्वाती गुडधे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. शिस्त, अचूक नियोजन व सातत्यपूर्ण अभ्यास तसेच या दरम्यान येणारे विविध अडथळे यावर मात करून जे विद्यार्थी प्रयत्नपूर्वक कार्यरत राहतात तेच विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत यशस्वी होतात असे मार्गदर्शन केले. त्यांनी या प्रवासातील अनेक उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना पटवून सांगितले.

सिटी न्यूज सुपरफास्ट — खामगाव

# नगराध्यक्षांची अचानक भेट आणि कचरा व्यवस्थापन कर्मचाऱ्यांची उडाली तारांबळ

प्रतिनिधी १८ जानेवारी



**खामगाव :** नगराध्यक्ष सौ अपर्णा फुंडकर यांनी शहराच्या घंटा गाडी व्यवस्थापन डेपोला भेट दिली. यावेळी नगरपालिकेचे गटनेते विजय उगले तसेच महाराष्ट्र प्रदेश सोशल मीडिया सेलचे संयोजक सागरदादा फुंडकर उपस्थित होते.

नगराध्यक्षांच्या अचानक भेटीमुळे उपस्थित घंटा गाडी कर्मचाऱ्यांची तारांबळ उडाली. नगराध्यक्ष यांनी सध्या सुरू असलेल्या कामाच्या नियोजनाची माहिती घेतली. त्यांच्या समस्या जाणून त्यांचे तत्काळ निरसन करण्याचे संबंधिताना आदेश दिले.

यासोबतच सदर कर्मचाऱ्यांना खामगाव शहराच्या स्वच्छते करता यापुढे अपेक्षित असलेल्या कामाची माहिती नगराध्यक्ष यांनी दिली. तसेच संबंधित कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना सूचना दिल्या खामगाव शहर स्वच्छ व सुंदर कसे राहील याबाबत त्यांनी नियोजनबद्ध असा कार्यक्रम आखला असून त्याप्रमाणे सर्वांनी काम करण्याचे आदेश आदेश नगराध्यक्षा सौ अपर्णा फुंडकर यांनी दिल्या.

> खामगाव शहराच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. यासोबतच स्वच्छ व सुंदर शहराचा आमचा संकल्प आहे त्यामुळे यात महत्वाची भूमिका सफाइ कामगाराची व शहरातील कचरा संकलन करणाऱ्या घंटा गाडी. कर्मचाऱ्यांची आहे. त्यामुळे स्वच्छ सुंदर शहरा साठी त्यांनी आपली महत्वाची भूमिका चोख पणे बजवावी. त्यांच्या तसेच कामात अडथळा ठरणाऱ्या समस्या सोडविण्यात येतील.
>
> **- सौ. अपर्णा फुंडकर**

यानंतर नगराध्यक्षांनी शहरातील मोठे कचरा कुंडी ठरत असलेल्या ठिकाणांना भेट देऊन पाहणी केली. यावेळी यावेळी या कचऱ्याचे तात्काळ निर्मूलन करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले व अशा प्रकारे गावातील कचरा कुड्या मध्ये अनेक दिवस कचरा पडून रहायला नको. याची तात्काळ उचल करून शहर कचरा मुक्त करावे असे निर्देश त्यांनी दिले.

# ढाबा चालकावर लोखंडी रॉडने हल्ला; गुन्हा दाखल

## ♦ दारू व जेवणाच्या वादातून मारहाण

प्रतिनिधी १८ जानेवारी

**खामगाव :** ढाब्यामध्ये दारू व जेवण देण्याच्या मागणीवरून झालेल्या वादातून ढाबा चालकावर लोखंडी रॉडने हल्ला केल्याची घटना माऊली फाटा ते टाकळी पारस्कर रस्त्यालगत असलेल्या आबाचा ढाब्यात घडली. या प्रकरणी १६ जानेवारी रोजी जळगाव जामोद पोलिस ठाण्यामध्ये आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी विनोद महादेव कावने (४०, रा. पंचवटी, नांदुरा, ता. नांदुरा) यांनी जळगाव जामोद पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, १५ जानेवारी रोजी सायंकाळी ७:३० च्या सुमारास संशयित आरोपी प्रभू बावस्कार माऊली, ता. जळगाव जामोद) हा ढाब्यात आला व दारू व जेवणाची मागणी केली.यावर फिर्यादीने 'सध्या काहीच उपलब्ध नाही', असे सांगितले; मात्र आरोपीने याकडे दुर्लक्ष करत शिवीगाळ केली. त्यानंतर ढाब्यात पडलेला लोखंडी रॉड उचलून त्यांच्या डोक्यावर व उजव्या हातावर मारहाण केली. या हल्ल्यात फिर्यादी गंभीररित्या जखमी झाला आहे. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे.फिर्यादीची तोंडी तक्रार व वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे १६ जानेवारी २०२६ रोजी मध्यरात्री १२:३५ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला.या गुन्ह्याचा तपास पोलिस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी भागवत उबरहंडे करत आहेत.

# सिटी न्यूज अकोला

रविवार, दि. १८ जानेवारी २०२६

http://epaper.citynewssuperfast.com


## मंगळवारी भगवान श्री रामदेवबाबा जम्मा कथा



प्रतिनिधी १८ जानेवारी

**अकोला :** स्थानिक आळशी प्लॉट मधील श्री रामदेवबाबा मंदिरात येथे माघ शुद्ध द्वितीया, मंगळवार २० जानेवारी २०२६ रोजी भगवान श्री रामदेवबाबा उत्सवा निमित्त सकाळी ७ वा. अभिषेक-हवन आणि सकाळी व दु. १२ वा., व सायंकाळी आरती होईल. तसेच सुप्रसिद्ध जम्मा कथा गायक राजेश सोमाणी, अकोला यांची जम्मा कथा दुपारी ४ वाजतापासून सुरु होईल. सर्व भाविकांनी दर्शनाचा व कथेचा लाभघ्यावा अशी विनंती भक्त मंडळाने केली आहे. श्री रामदेव बाबा उत्सव निमित्ताने मंदिरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. भाविकांचा त्यात मोठ्या संख्येने सहभाग असतो. उत्सवाची तयारी केली जात आहे.

## विवेकानंद शाळेच्या शिरपेचात आनंदी ने खोवला मानाचा तुरा



प्रतिनिधी १८ जानेवारी

**अकोला:** नागपूर येथे नुकत्याच संपन्न झालेल्या विदर्भ विज्ञान स्पर्धेतील विदर्भ स्तरावरील पोस्टर मेकिंग स्पर्धेत ११ जिल्ह्यातील एकूण २५ विद्यार्थी सहभागी झाले होते.या सर्व विद्यार्थ्यां मधून तापडीया नगर येथील विवेकानंद शाळेची इयत्ता ८ वी ची कु. आनंदी मंगेश गावंडे हिने प्रथम क्रमांक पटकावला. तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. आनंदीने स्वतःमधील कल्पकतेचा कस लावून ' वन हेल्थ संरक्षण आणि वातावरण बदल' या विषयावर आधारीत सुबक रंगसंगती असलेले नयनरम्य असे चित्र रेखाटले.तिने या सूयशाचे श्रेय आई - वडिल, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. संगिता कोकिळ,शाळेचे कलाशिक्षक मनोज वाडेकर यांना दिले.

## अंतिम पैसेवारी जाहीर

**अकोला:** जिल्ह्यात एकूण १ हजार १२ गावांपैकी ९९० गावांची पैसेवारी काढण्यात आली आहे. या गावांची पैसेवारी ५० पेक्षा कमी (४८ पैसे) अशी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी याबाबत पत्र जारी केले. सर्व ग्रामपंचायत कार्यालय स्तरावर, चावडीवर, तसेच दवंडीद्वारे प्रसिद्धी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## निधन वार्ता

### गौकर्णा सिरसाट



**अकोट:** बेलुरा येथील मिलिंद शिरसाट यांची आई गौकर्णा दिनकर शिरसाट (७०) यांचे निधन झाले. त्यांच्या पक्षात १ मुलगा व १ मुलगी तसेच आप्तपरिवार आहे.

### प्रमोद मंगळे



**अकोट:** बेलुरा येथील प्रमोद भानुदास मंगळे, ५७, यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पक्षात २ मुले, २ मुली व आप्तपरिवार आहे.

## जितापूर शेतशिवारात झटका मशीन भुरट्या चोरांची टोळी सक्रिय !

प्रतिनिधी १८ जानेवारी

**अकोट:** ग्राम जितापूर रूपागड , पिंपरी परिसरात शेत शिवारातील झटका मशीनची भुरट्या चोरी करणारी टोळी सक्रिय झाल्याने शेतकऱ्यांमध्ये दहशत निर्माण झाली. या भागात मागील वर्षी झटका मशीन चोरीचे सत्र सुरू होते. बागायती शेती असून पहाडी भागात रात्रीला या परिसरात वन्य प्राण्यांचा हैदोस वाढला असून शेतीपिकांचे अतोनात नुकसान होत आहे.

जितापूर येथील शेतकरी भागवत शहादेव मंगळे यांच्या शेतातील मीटर पेटीचे कुलूप तोडून झटका मशीन चोरून नेल्याची घटना घडली. गेल्या महिन्यात गोठ्यामधील फोर व्हीलर गाडीचे साईड ग्लास व काचा दोन वेळा फोडण्यात आल्या. या परिसरातील शेतकऱ्यांनी स्वतः च्या पिकाचे संरक्षण म्हणून शेतात चारही बाजूने तार बांधून त्यावर झटका मशीन लावल्या आहेत. मात्र गेल्या काही दिवसांपासून अज्ञात चोरट्यांकडून शेतातील



मीटर पेठ्यांचे कुलूप तोडून ह्या झटका मशीन चोरून सपाट्याने घटनांमध्ये वाढ झाली आहे. या चोरीच्या घटनांमुळे परिसरातील ८ शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला असून त्यांचे अंदाजे प्रत्येकी २१००० हजार रु. व स्पिंकलर पाईप व नौजल १५००० हजार रु. व बैलगाडी साहित्य व स्पिंकलर पाईप असे अंदाजी ३५००० हजार रु.आर्थिक नुकसान झाले आहे. व पिकांच्या संरक्षणाचा प्रश्न सुध्दा गंभीर बनला आहे.रात्रीला बिबट्या वाघ यांची दहशत वाढल्यामुळे शेताकडे जाणे सहसा टाळले जात असून मागील वर्षी याच शेत शिवारातील प्रफुल्ल मधुकर मंगळे, विठ्ठल नामदेव बहिरे, योगेश हरिभाऊ मंगळे, रामहरी रमेश मंगळे, करण विलास लबडे, गजानन शिंगणे जीतापूर रुपागड येथील सूनलाल सोलकर, मधुकर सोलकर पो.पाटील श्रीराम भारसाकडे या तिन्ही शेतकऱ्यांचे झटका मशीन केबल वॉटर पंप पिंपरी येथील शेतकरी बजरंग राजेंद्र मानकर यांच्या शेतातील बैलगाडी व १५ स्पिंकलर पाईप शेतातील झटका मशीन चोरीमुळे शेतकऱ्यांना पुन्हा नवीन झटका मशीन आणून बसविण्यासाठी मोठा खर्च करावा लागत असून या वन्य प्राण्यांच्यामुळे पिकांचे नुकसानही होत आहे. सिटी न्यूज रिपोर्टर यांनी हिवरखेड अंतर्गत येत असलेल्या पोलीस स्टेशनला शेतकऱ्यांसह ठाणेदार गजानन राठोड यांची मुलाखत घेऊन कारवाईची प्रतिक्रिया नोंदवली. जीतापूर सरपंचपती विठ्ठल मंगळे, तंटामुक्ती अध्यक्ष सचिन मंगळे, ऋषी लोणकर, यांची मागणी असून संजय शेळके यांनी स्वतः या चोरीच्या प्रकरणाला उलगळा बसण्यासाठी ५००१ हजार बक्षीस जाहीर केले आहे त्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल असे आवाहन सुद्धा केले आहे.

## हिवरखेडला भाजपाने केला जल्लोष साजरा



प्रतिनिधी १८ जानेवारी

**हिवरखेड :** येथील भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी स्थानिक चंडिका चौकात विजय जल्लोष साजरा केला.

महानगरपालिका मध्ये २९ जागा पैकी २६ जागांवर भाजपाने विजय मिळवला या विजयाचा हिवरखेड मध्ये भाजपच्या वतीने विजय जल्लोष साजरा करण्यात आला, यावेळी उपस्थित रमेश दुतोडे, संदीप इंगळे, किरण सेदानी, संजय हिवराळे, सुदाम राऊत, मंगेश दुतोंडे, दीपक रायबोले, शांताराम कवळकार, संतोष शर्मा, अन्सार खा, विनोद ढबाले, मधूकर पोके, नंदू शिंदपुरे, व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## यश काळेची संघर्षातून यशाकडे झेप

वि. प्रतिनिधी १८ जानेवारी



**अकोट:** अकोट तालुक्यातील वाई येथील तरुण यश रमेश काळे याने जिद्द, चिकाटी आणि कष्टाच्या जोरावर अशक्य गोष्ट साध्य करून दाखवली आहे. अत्यंत गरीब कुटुंबातून आलेल्या यशची नुकतीच सशस्त्र सीमा बल (एएँ) या दलात निवड झाली असून, त्यामुळे वाई गावात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

यशच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. आई शेतमजुरी करते तर वडील किराणा दुकानात काम करतात. आर्थिक अडचणी असूनही आई-वडिलांनी आपल्या मुलाच्या शिक्षणात आणि स्वप्नात कधीही कमी पडू दिली नाही.

ऑक्टोबर २०२४ मध्ये यशने अकोट येथील नामांकित राजे संभाजी अकॅडमीमध्ये प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. तेथे त्याला प्राध्यापक राजीव खारोडे सरांचे योग्य मार्गदर्शन लाभले. 'मला भारतीय सैन्यात जायचेच आहे,' असा निर्धार करून यशने रात्रंदिवस मेहनत घेतली. फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या लेखी परीक्षेत त्याने घवघवीत यश मिळवले. त्यानंतर ऑक्टोबर २०२५ मध्ये पार पडलेल्या शारीरिक चाचणीतही तो यशस्वी ठरला. पुढील टप्प्यात वैद्यकीय चाचणीसाठी नागपूरला जाण्यासाठी पैसे नसल्यामुळे अडचण निर्माण झाली होती. मात्र आई-वडिलांनी कोणताही विचार न करता घरातील काही धान्य विकून यशला प्रवासासाठी पैसे दिले. त्यानंतर नागपूर येथे झालेली वैद्यकीय चाचणीही यशस्वीरीत्या पार पडली. नुकत्याच जाहीर झालेल्या अंतिम निकालात यशने पहिल्याच प्रयत्नात यश मिळवून एसएस बी मध्ये आपली निवड निश्चित केली आहे. यश म्हणतो, 'माझ्या यशाचे श्रेय माझ्या आई-वडिलांना आणि प्राध्यापक राजीव खारोडे सरांना जाते.' अशा भावना त्याने माध्यमांशी बोलताना व्यक्त केल्या.

## तालुक्यात अवैध धंद्यांचे पेव; पोलिसांची हतबलता

विशाल नांदोकार १८ जानेवारी



**तेल्हारा:** शहरासह तालुक्यात सध्या अवैध धंद्यांनी सीमा ओलांडली असून जुगार, वरली-मटका आणि दारूच्या अड्ड्यांनी ग्रामीण भागाला विळखा घातला आहे. विशेष म्हणजे, हे सर्व अड्डे आणि त्यांची ठिकाणे पोलिसांना माहित असूनही, केवळ 'थातूर-मातूर' कारवाई करून वेळ मारून नेली जात असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, जेव्हा नागरिकांचा दबाव वाढतो तेव्हा पोलीस काही ठिकाणी छापे टाकल्याचे नाटक करतात. मात्र, या कारवाईत केवळ किरकोळ मुद्देमाल जप्त केला जातो किंवा 'अर्थपूर्ण' तडजोडी करून मुख्य सुत्रधारांना मोकळे रान दिले जाते. पोलीस येतात, थातूर-मातूर पंचनामा करतात आणि निघून जातात, त्यानंतर काही तासांतच हे अड्डे पुन्हा जोमाने सुरू होतात. या प्रकारामुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तेल्हारा शहरातील भर रस्त्यांवर सुरु असलेले दारू, वरली मटका, गांजाचे अड्ड्यांमुळे शाळेमध्ये ये जा करणाऱ्या विद्यार्थ्यांवर याचा वाईट परिणाम होत असतांना सुद्धा यावर कोणी लक्ष देण्यास तत्पर दिसत नसल्याचे चित्र सध्या तेल्हारा शहरात पहावयास मिळत आहे.

तालुक्यातील कोणत्या गावात कुठे दारू गाळली जाते आणि कोणत्या कोपऱ्यावर मटक्याचे आकडे घेतले जातात, याची इत्थंभूत माहिती स्थानिक बीट जमादारांपासून ते वरिष्ठ स्तरापर्यंत सर्वांना आहे. तरीही ठोस कारवाई का होत नाही? हा चर्चेचा विषय ठरत आहे. ठवरिष्ठांचे आदेश आहेतठ असे सांगून कडक कारवाई टाळली जाते की यामागे काही 'मोठे आर्थिक साटेलोटे' आहे, अशी शंका आता व्यक्त केली जात आहे. ठोस कारवाई होत नसल्याने अवैध धंदे चालवणाऱ्यांचे मनोबल वाढले आहे. पोलिसांच्या नाममात्र कारवाईची भीती गुन्हेगारांना उरलेली नाही. उलट, तक्रार करणाऱ्या नागरिकांनाच धमकावण्याचे प्रकार वाढले आहेत. यामुळे तालुक्यात शांतता व सुव्यवस्था धोक्यात आली असून सामान्य जनता भयभीत आहे. स्थानिक पोलीस प्रशासन ढिम्म असल्याने आता अकोला जिल्हा पोलीस अधीक्षकांनीच या प्रकरणात लक्ष द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे. तेल्हारा तालुक्यातील या अड्ड्यांवर विशेष पथकाद्वारे धाडी टाकून कायमस्वरूपी बंदोबस्त करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## हाता गावात चोरट्यांनी किमती ऐवज लंपास केला

प्रतिनिधी १८ जानेवारी

**अकोला:** बाळापूर तालुक्यातील हाता गावात अनंत कुचके यांच्या निवासस्थानी चोरी झाली. त्यांच्या घरातील तिजोरी फोडून चांदीचे शिक्के, ४० हजार रुपये , १० ग्रॅम सोन्याची अंगठी, ५ ग्रॅमची सोन्याची नथ चोरून नेल्याची माहिती अनंता कूचके यांनी दिली. इतकेच नाही तर एका देवस्थानात देखील चोरीचा अयशस्वी प्रयत्न झाल्याची माहिती आहे. याबाबत तक्रार करण्यात आली आहे. पोलिसांनी गावात येऊन पाहणी केली. चोरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी केली जात आहे.



## काँग्रेस नेते हिदायत पटेल यांना सर्वपक्षीय श्रध्दांजली

प्रतिनिधी १८ जानेवारी

**अडगांव बु. :** काँग्रेससचे जेष्ठ नेते हिदायत पटेल यांना सर्व पक्षाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मिरसाहेब हॉल मधे श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी सभेच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ काँग्रेस नेते मनोहरलाल फाफट होते. शेतकरी संघटनेचे नेते लक्ष्मीकांत कौठकार, नंदकिशोर अढाऊ, गोपाल कोल्हे, संजय राजनकार, डॉ गुलाम नबी,गजानन आप्पा मुंगसे, माणिकराव घाटे,अ.फरीद गु.आरीफ, असलम उल्ला, नाना बहाकर,नरेंद्र मानकर ,अभिजीत ढगे,अशोक घाटे,राजीक कुरेशी, शे.जमीर, नारायण पत्की , अजगर अली मिरसाहेब, डॉ.पंजाबराव धामोडे, राजु रोहणकार, दिपक रेळे, अफरोज खॉं, आदी गावातील शेकडो नागरीक विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी पत्रकार उपस्थित होते.यावेळी उपस्थितीतांनी दोन मीनीट मौन पाळुन सामुहीक श्रध्दांजली वाहीली तर मनोहरलाल फाफट यांच्या सह गोपाल कोल्हे, राजीक कुरेशी, डॉ. गुलाम नबी ,नरेद्र मानकर आदीनी पटेल यांच्या सोबतच्या आठवणीना उजाळा दिला.कार्यक्रमाचे संचालन अशोक घाटे यांनी केले.

## अकोली जहागीर येथे हनुमान शंकरपटाचे आयोजन

प्रतिनिधी १८ जानेवारी

### ◆ लाखोंच्या बक्षिसांची लयलूट





**अकोट:** अकोली जहागीर अंबाडी दिवठाणा पणज पंचक्रोशीतील शंकरपट बैलजोडी मालक व शौकीनांसाठी वीस वर्षांपासून शंकरपट व्यवस्थापक रामभाऊ वाडोकार यांच्या सहकार्याने १८ ते २० जानेवारी पर्यंत हनुमान शंकर पटायचे आयोजन करण्यात आले आहे.

शंकर पटाचे उद्घाटक माजी आमदार संजय गावंडे, प्रमुख पाहुणे मंगेश चिखले, दिलीप बोचे, नवनीत लखोटीया, सरपंच संजय कासदे, श्याम गावंडे, रामदास ठाकरे, नरेंद्र काकड, शिवाजी देशमुख, विजय दातीर, केशव जायले, अंभीर मोरे, दामोदर सरोदे, जसराज बहाळे, अमोल बदरखे, दीपक जायले, सुभाष सरोदे, प्रफुल बदरखे, ज्ञानेश्वर मानकर, भाऊराव सोनोने, शंकर पट बक्षीस वितरण संग्रामभैय्या गावंडे, महेश गणगणे, अविनाश जायले, उमेश जायले, किशोर वडदकार, पंच कमिटी पट महर्षी रामाभाऊ वाडोकार, विजय मेतकर, दिलीप शेंडे, ऋषिकेश वाढोकर, सुनील डांगटे, विनायक इंगळे, पांडुरंग डांगटे, अरविंद गाडगे, दामोदर सरोदे, इत्यादींची उपस्थिती राहील. नियम व अटीचे पालन करावे लागेल. जीविताची जबाबदारी त्यांच्यावर राहील, पंच कमिटीचा निर्णय अंतिम राहील, काही कारणास्तव कार्यक्रमात बदल करण्यात येईल, एका जोडीला एकच नंबर दिल्या जाईल, पटाचे नियम नेहमीप्रमाणे राहतील. उल्हास दाभाडे यांच्या धावपट्टी घड्याळ काटा नेतृत्वात राहील. अ गट पहिले बक्षीस संग्रामभैय्या गावंडे ३१००० हजार रु., दुसरे बक्षीस महेश गणगणे, जसराज बहाळे २१००० हजार रु. अ गटाकरिता. एकूण १५ बक्षीस जाहीर केले आहेत. क गट पहिले बक्षीस २१००० हजार रु.रामदास ठाकरे डांगरखेड माजी तहसीलदार, २ रे बक्षीस ११००० हजार रु. संजय गावंडे ,शाम गावंडे, ३ रे बक्षीस ५१०० रु. विकास देशमुख, क गट करिता एकूण विविध १५ बक्षीस जाहीर केल्या आहेत, अ गट स्पर्धकांना गोल्डन ढाल, तर क गटाकरिता सिल्वर कप निसर्ग ॲग्रो एजन्सी तर्फेआकोट देण्यात येईल,

गावगाडा गट पहिले बक्षीस ११००रु. ज्ञानेश्वर मानकर, भैय्यूजी महाराज आश्रम पोपटखेड, २ रे बक्षीस ५०००रु. दिनेश बोचे पत्रकार, गावगाडा गटाकरिता एकूण १२ बक्षिसे जाहीर केले आहे, यावेळी कार्यकर्ते कधीर भाई, सलीम भाई, अंकुश रणगिरे, संतोष धांडे, अनिल कांबळे, संतोष दातीर, संदीप शेळके, नागेश जायले, कुणाल दामोदर, उमेश सोनोणे, अनिल लव्हाळे, गोपाल शेंडे, गोपाल कैकाडी दिगंबर कैकाडी,ज्ञानेश्वर खन्नाडे सहकार्य करीत आहेत. सर्व जोडी मालकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन पट व्यवस्थापक रामाभाऊ वाडोकार यांनी केले आहे.

## प्राणघातक हल्ला प्रकरणात आरोपीला १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा

प्रतिनिधी १८ जानेवारी

**अकोट:** प्राणघातक हल्ला प्रकरणात आरोपी संजय भटकर याला अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश बी.एम. पाटील यांनी दहा वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. १७ जानेवारी रोजी हा निकाल दिला.

दहीहांडा पोलिस स्टेशन अंतर्गत एका घटनेतील वाद बु. येथील आरोपी संजय भटकर याने लोखंडी फावडयाच्या दांडयाने फिर्यादी विशाल गोटुकडे व त्याचा मित्र विनोद कळसकर यांच्यावर इतर ६ आरोपींच्या मदतीने प्राणघातक हल्ला करुन जीवाने मारण्याचा प्रयत्न केला होता.

या प्रकरणात सरकारी वकील अजित देशमुख न्यायालयात युक्तीवाद केला की १४.०६.१४ च्या रात्री ११ वाजताच्या सुमारास वडद बु. गावजवळील पुर्णा नदीच्या पात्रातून एक ट्रॅक्टर फिर्यादी विशाल व त्याचा मित्र विनोद यांना दिसला ते पाहण्याकरीता नदीकडून येणा-या रस्त्यावर दोघेही थांबले असता निळ्या रंगाचा सोनाली कंपनीचा टॅक्टर आरोपी संजय भटकर हा स्वतः चालवित होता. गावातील नदीच्या घाटावरुन टॅक्टरद्वारे रेती नेत होता तेव्हा फिर्यादी विशाल व त्याचा मित्र विनोद याने आरोपी संजय भटकर यास म्हटले की आमच्या गावातील नदी खराब का करतोस त्यावर आरोपीने तुझ्या बापाचे काय जाते तुम्हला बघुन घेतो असे म्हणून निघुन गेला. व तो राग मनामधे ठेवून आरोपी संजय भटकर याने इतर ६ आरोपींच्या मदतीने दि.१४.०६.२०१४ चे रात्री ११ वाजता फिर्यादी व त्याचा मित्र विनोद याला बघताच ट्रॅक्टर थांबविला व ट्रॉलीत बसलेल्या लोकांना म्हणाला बघता काय धरा साल्यांना असे म्हणून फिर्यादी विशाल व त्याचा मित्र विनोद कळसकर यास सर्वांनी लाथाबुक्कयांनी व फावडयांनी मारण्यास सुरवात केली. विशाल गोटुकडे याच्या डोक्यावर मारले व त्याला खाली पाडले, तसेच विनोद कळकसकर याला सुध्दा मारुन जागेवरच तो बेशुध्द पडला व दोघेही जखमी रक्तबंबाळ झाले होते. विशालने विनोदचे वडील वासुदेवराव यांच्या मदतीने उपचाराकारीता ग्रामीण रुग्णालय दहिहांडा येथे विनोदला नेले. परंतु प्रकरण गंभीर असल्याने डॉक्टरांनी अकोला येथे जाण्यास सांगितले. दहीहांडा पो.स्टे. ला माहिति दिल्यानंतर दहीहांडा पोलीसांनी १५.०६.२०१४ चे रात्री विशाल गोटुकडे याच्या बयाणावरुन सर्व आरोपी विरुध्द गुन्ह्याची नोंद केली. तपास अधिकारी उपनिरीक्षक भास्कर तायडे यांनी आरोपी विरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. सरकारी वकील अजित देशमुख यांनी १५ साक्षीदारांच्या साक्षी न्यायालयात नोंदविल्या. अजित देशमुख यांनी न्यायालयात युक्तीवाद केला की, आरोपीने मनामधे खुन्नस ठेवुन दोन्ही जखमींना ठार मारण्यासाठी प्राणघातक हल्ला केला. आरोपीला कुठल्याही प्रकारची दयामया न दाखविता कठोर शिक्षा देण्यात यावी. या प्रकरणात दहिहांडा पोलीस स्टेशनचे पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस हवालदार दिनेश काळे यांनी व पी. बी. सहारे यांनी सहकार्य केले. दोन्ही पक्षाच्या अंतिम युक्तीवादानंतर अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश बी.एम. पाटील यांनी आरोपी संजय भटकर याला १० वर्ष कारावासाची शिक्षा दंडासह ठोठावली.


सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला शहरात उपलब्ध आहे

परळीकर न्यूजपेपर एजन्सी — डाबकी रोड 9766005335

अरुण गुजर बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9423429605

येळणे बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9028947634

वाडेकर बुक स्टॉल — जुने बस स्टॅंड 9921940878

यश न्यूज पॉईंट — मलकापूर 9075012816

मेडोना युनुसेट सलून — बाराज्योर्तिलींग रोड, अकोला 7507340789

पेंटर पाठक एजन्सी — महानगर पालिका मागे, अकोला 8605844453

जाहिरातीसाठी संपर्क 9209956616 | बातम्यासाठी संपर्क 9075012801

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

रविवार, दि. १८ जानेवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


# बनावट नोटाच्या रॅकेटचा पर्दाफाश

## दोघे रंगेहाथ पकडले; मालक फरार

प्रतिनिधी १८ जानेवारी

**पुसद** : पुसद शहरालगत बोरी खुर्द येथील एका घरात पाचशे रुपयांच्या बनावट नोटा छापल्या जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

गोपनीय माहितीच्या आधारे उपविभागीय पोलीस अधिकारी (एसडीपीओ) हर्षवर्धन बी.जे. यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार, १७ जानेवारी रोजी सायंकाळी छापामार कारवाई करण्यात आली. या कारवाईत दोन संशयितांना बनावट नोटा तयार करताना रंगेहाथ पकडण्यात आले, तर घराचा मालक फरार झाला आहे.

गणेश गायकवाड (वय ४६) रा पुसद, संतोष सूर्यवंशी (वय ५०) रा. कळमनुरी असे अटक केलेल्या



आरोपीचे नाव आहे. तर विनोद कुरडे (घर मालक) असे फरार आरोपीचे नाव असून त्याचा शोध पोलिसांनी सुरू केला आहे.

पोलिसांनी घटनास्थळावरून पाचशे रुपयांच्या १५ बनावट नोटा, ४ खऱ्या नोटा तसेच बनावट नोटा तयार करण्यासाठी वापरलेला प्रिंटर, केमिकल, कागद, कटर, पॅड आणि इतर साहित्य जप्त केले आहे.

एसडीपीओ कार्यालयाला बोरी खुर्द येथील घरात बनावट नोटा तयार होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीची खातरजमा करून



वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार सायंकाळी छापा टाकण्यात आला. कारवाईदरम्यान दोघे संशयित बनावट नोटा छापताना आढळले.

एसडीपीओ कार्यालयातील पोलीस कर्मचारी सुनील मदने यांनी पुसद शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे. पुढील तपास एपीआय केदार करीत आहेत.

ही कारवाई एसडीपीओ हर्षवर्धन बी.जे. यांच्या मार्गदर्शनाखाली पुसद शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार सेवानंद वानखडे यांच्या देखरेखीखाली पार पडली. कारवाईत सुनील मदने, पंकज पातुरकर, शंकर तळीकोटे, जुनैद सैयद, खुशाल चौहान, दिनेश सोलंके आदी पोलीस कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

बनावट नोटा रॅकेटचा पर्दाफाश झाल्याने परिसरात खळबळ उडाली असून, फरार आरोपीला लवकरच ताब्यात घेण्याचे पोलिसांचे प्रयत्न सुरू आहेत.

# गोवंश वाहतूक : तीन आरोपी ताब्यात; 73 लाखाचा मुद्देमाल जप्त





प्रतिनिधी १८ जानेवारी

**यवतमाळ** : गोवंश कत्तलीसाठी अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या ट्रक व कंटेनरवर वडकी पोलिसांनी धडक कारवाई केली . या कारवाईत एकूण 73,80,000/- रुपये किंमतीचे गोवंश व वाहन जप्त केले.

घटनास्थळी तीन आरोपी ताब्यात घेण्यात आले. शहा आलम मोहम्मद फारुख, वय 32, रा. भोजपूर, उत्तर प्रदेश, शाहरुख अली, वय 29, रा. मेरठ, उत्तर प्रदेश, सरताज कल्लू, वय 35, रा. कुंदरकी, ता. मुरादाबाद, उत्तर प्रदेश अशी आरोपींची नावे आहे. दि. 16/01/2024 रोजी वडकी पोलीस स्टेशन हद्दीत गोपनीय माहिती मिळाल्यानंतर MH 40 AK 3933 क्रमांकाच्या ट्रकचा पाठलाग करून त्यात 26 गोवंश (पैकी 02 बैल मृत) आढळले.

प्रत्येकी 35,000/- रुपये धरून एकूण 29,10,000/- रुपये किंमतीचा ट्रक व गोवंश जप्त करण्यात आला. आरोपींविरुद्ध कलम 325, 3(5) BNS, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम 5,5अ,5ब, प्राण्यास कृरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम 11(1),(घ)(ड)(च)(ज)(ट)(झ) आणि M.V. Act 119, महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला गेला. याच दिवशी दुपारी देवधरी घाट येथे UP 21 HE 7398 क्रमांकाचा कंटेनर पकडण्याचा प्रयत्न केला असता, चालक व साथीदार पांढरकवडा कडे पळाले. पोलीसांच्या मदतीने वाय पॉईंट पांढरकवडा येथे त्यांना पकडले. वाहनाची तपासणी केल्यावर 42 गोवंश (पैकी 03 बैल मृत) मिळाले. प्रत्येकी 35,000/- रुपये धरून 44,70,000/- रुपये किंमतीचा कंटेनर जप्त झाला.

या कारवाईत शहा आलम मोहम्मद फारुख, वय 32, रा. भोजपूर, उत्तर प्रदेश, शाहरुख अली, वय 29, रा. मेरठ, उत्तर प्रदेश, सरताज कल्लू, वय 35, रा. कुंदरकी, ता. मुरादाबाद, उत्तर प्रदेश या आरोपींना अटक केली.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, सहाय्यक पोलीस अधीक्षक रॉबिन बंसल यांच्या मार्गदर्शनाखाली वडकी पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुखदेव भोरकडे, PSI प्रकाश देशमुख, GPSI सुनील कुडमेथे, ASI दीपक मडकाम, HC भोजराज करपते, HC अभिजीत कोशटवार, HC सचिन नेवारे, HC निलेश वाढाई, PC अरविंद चव्हाण, PC अमीर किनाके, पांढरकवडा पोलीस ठाण्याचे HC विलास जाधव यांनी केली.

# निम्न पैनगंगा प्रकल्प : कायदेशीर मंजुरीशिवाय काम सुरू

प्रतिनिधी १८ जानेवारी

**यवतमाळ** : आर्णी .लुक्शातील खडका निम्न पैनगंगा सिंचन प्रकल्प प्रकरणी निवेदनाची गंभीर दखल घेतली असून, संबंधित विभागांना लेखी आदेश पाठवून प्रकल्पाच्या कायदेशीर पूर्ततेसाठी त्वरित कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समिती (विदर्भ–मराठवाडा), राष्ट्रीय किसान मोर्चा, महाराष्ट्र यांच्या संयुक्त निवेदनात, आवश्यक कायदेशीर मंजुरी न घेतल्यास प्रकल्पाचे काम सुरू केले असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला. हा महाराष्ट्र–तेलंगणा आंतरराज्यीय प्रकल्प असूनही SIA, R&R, पर्यावरण मंजुरी, वनमंजुरी, DPR मंजुरी, ग्रामसभा व जनसहमती, जमीन संपादनाची अंतिम अधिसूचना आणि CWC मान्यता अशा अनिवार्य प्रक्रियांची पूर्तता न करताच काम आदेश काढण्यात आले असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. या प्रकल्पामुळे सुमारे ९५ गावे, ५० हजार एकर शेती आणि जवळपास १.५ लाख नागरिक प्रभावित होण्याची शक्यता आहे. तसेच पुनर्वसन व पुनर्स्थापनेची कोणतीही पारदर्शक प्रक्रिया राबवलेली नाही. निवेदनात प्रशासनाला १० दिवसांचा अल्टिमेटम देत सर्व कागदपत्रे सादर करावीत किंवा कायदेशीर पूर्तता न झाल्यास प्रकल्पाचे काम तात्काळ थांबवावे, अशी मागणी केली होती.

# आर्णी येथे माहिती अधिकार कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण शिबिर

प्रतिनिधी १८ जानेवारी

**आर्णी** : माहिती अधिकार कायदा हा केवळ अर्ज भरण्यापुरता मर्यादित नसून शासन व प्रशासनाला जनतेपुढे उत्तरदायी बनवणारे प्रभावी शस्त्र आहे, असे प्रतिपादन माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, मुंबईचे अध्यक्ष सुभाषराव बसवेकर यांनी केले. माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, मुंबई यांच्या वतीने आर्णी तालुक्यातील देऊरवाडा येथील प्राथमिक शाळेच्या प्रांगणात आयोजित एकदिवसीय माहिती अधिकार कार्यकर्ता मार्गदर्शन व प्रशिक्षण शिबिरात ते बोलत होते.

या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन प्रल्हादजी इंगळे यांनी केले होते. शिबिरास नागपूर, वर्धा, यवतमाळ तसेच नेर–घाटंजी तालुक्यातील मोठ्या संख्येने माहिती अधिकार कार्यकर्ते उपस्थित होते. प्रशिक्षणादरम्यान माहिती अधिकार कायद्याचा योग्य



व परिणामकारक वापर, माहिती मिळविण्याची प्रक्रिया, प्रथम अपील व द्वितीय अपील, तसेच दंडात्मक तरतुदी यांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमात यवतमाळ जिल्हा प्रचार प्रमुख प्रदीप भगत यांनी माहिती अधिकार कायदा २००५ चा इतिहास, उद्देश व महत्त्व स्पष्ट केले. कायद्यातील महत्त्वाच्या कलमांवर त्यांनी व्यवहार्य मार्गदर्शन करत भ्रष्टाचार उघडकीस आणण्यासाठी तसेच सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आरटीआयचा प्रभावी वापर कसा करता येईल, हे प्रत्यक्ष उदाहरणांसह समजावून सांगितले. माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता निर्भीडपणे कार्य करावे, तसेच प्रशासनावर जनतेचा अंकुश राहावा यासाठी संघटित प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे मार्गदर्शकांनी यावेळी नमूद केले. या शिबिरास दिलीप पवार, अनिल मोहोळ, रतन बुरबुरे, विजय बुरबुरे, अभिजीत मुंगळे, विलास ठाकरे, दिलीप राणे यांच्यासह अनेक माहिती अधिकार कार्यकर्ते व जागरूक नागरिक उपस्थित होते.

# भाजी मार्केटमध्ये व्यसनाधीन सोडतात गांजाचा धूर

प्रतिनिधी १८ जानेवारी

**यवतमाळ** : संत सेना चौकातील भाजी मार्केटसह नगर परिषद क्षेत्रात व्यसनाधीन युवकांच्या धुम्रपान व दारू पिण्याची समस्या नागरिकांसमोर उभी राहिली आहे. भाजी मार्केट बंद होण्याच्या आधीच काही युवक या भागात गांजा सेवन करीत धूर सोडतात तसेच दारू पितात. त्यामुळे अनेकदा त्या भागात भांडण तंडे घडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. भाजीपाला घेण्यासाठी या भागात महिला वर्ग व शहरातील नागरिक येतात, त्यांना या प्रकारामुळे सतत त्रास सहन करावा लागत आहे.

याशिवाय, काही व्यावसायीक सावकारांकडून व्याजाने घेतलेले पैसे वसूल करण्यासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांशी वादविवाद होतो. पैशावरील या तंट्यांमुळे अनेकदा स्थानिक व्यवसायिक व सावकार यांच्यात भांडणे घडत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. भाजी मार्केटच्या आसपास वाहतूक पोलिसांचे अधिक लक्ष देऊन आहे. यामुळे महिला वर्ग, वृद्ध आणि सामान्य नागरिकांना या भागात सुरक्षित खरेदी करता यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सध्या या भागात व्यसनाधीन युवकांवरील नियंत्रण आणि पैशावरील वाद नियंत्रित करण्यासाठी स्थानिक प्रशासनाच्या तातडीच्या कारवाईची गरज असल्याचे नागरिकांचे मत आहे. जिल्हा वाहतूक शाखेने शहरातील संत सेना चौकात वाहतूक पोलिसांची नेमणूक केली आहे. त्याच्याकडून या भागातील वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न होत आहे. मात्र अनेक व्यावसायीक निर्धारीत केलेली जागा सोडून संत सेना चौक ते जाजु चौकाकडे जाणा-या मार्गावर आपल्या हातगाड्या लावत असल्याने वाहतूकीला अडथळा निर्माण होत आहे. भाजी मार्केट मध्ये व्यसन करणा-यावर कारवाई करावी अशी मागणी जोर धरत आहे.

# जिजाऊ ज्ञान मंदिर स्कूल भांबरखेडा येथे आनंद मेळावा

प्रतिनिधी १८ जानेवारी

**उमरखेड** : तालुक्यातील जिजाऊ ज्ञान मंदिर इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज भांबरखेडा येथे आनंद मेळावा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष, शेंबाळपिंपरी येथील बालरोग तज्ज्ञ आणि भाजप मंडळ अध्यक्ष पुसद, डॉ. अजित चंदेल होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. गजानन मनवर, पोफाळी पोलीस स्टेशनचे बीट जमादार आठवले उपस्थित होते. कार्यक्रमात पिंपळदरी गावाचे सरपंच बंडू ठाकरे, शाळेचे संस्थापक अध्यक्ष दिपक धर्माधिकारी, सेक्रेटरी कुणाल वानखेडे आणि मुख्याध्यापक तिरुपती मुंडे यांनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांनी जिजामाता, छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन



करून केली. त्यानंतर अध्यक्ष डॉ. अजित चंदेल यांनी भाषणादरम्यान विद्यार्थ्यांनी विक्रीसाठी आणलेल्या विविध पदार्थांचे कौतुक केले. नर्सरी, K.G. वन, K.G. टू वर्ग, पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला. प्रमुख अतिथी बीट जमादार आठवले साहेब यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले, तर मुख्याध्यापक तिरुपती मुंडे यांनी कार्यक्रमाचा संपूर्ण आढावा सांगितला. कार्यक्रमाला शाळेतील पालक वर्ग आणि भांबरखेडा गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षक व उपमुख्याध्यापिका रामेश्वरी मुंडे, मनोज चव्हाण, ज्ञानेश्वर शिंदे, सुषमा हिंगाडे, रेखा पावडे, सुषमा कदम, रोशनी कदम, मुक्ता कदम, वाहन चालक बंडू कदम, पवन मोरे, सलीम भाई, कन्हैया नुकर, दीपक जोगदंडे, विकास धुळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यास मदत केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपमुख्याध्यापिका रामेश्वरी मुंडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शाळेचे शिक्षक मनोज चव्हाण यांनी केले.

# महिला लोकशाही दिन उद्या

प्रतिनिधी १८ जानेवारी

**यवतमाळ** : महिलांच्या तक्रार निवारणासाठी दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित जिल्हा महिला लोकशाही दिन या महिन्याचा कार्यक्रम सोमवार, १९ जानेवारी रोजी, जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवन येथे होणार आहे.

तालुकास्तरावर दर महिन्याच्या चौथ्या सोमवारी तालुकास्तरीय महिला लोकशाही दिन आयोजित केला जातो. महिलांनी प्रथम तालुकास्तरीय कार्यक्रमात तक्रार दाखल करणे अनिवार्य आहे.

सदर तक्रारीवर योग्य कारवाई झाली नाही तर जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन मध्ये तालुकास्तरीय अर्ज व टोकन क्रमांकासह तक्रार सादर करता येईल.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्यांनी महिला नागरिकांना आवाहन केले आहे की न्यायप्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसलेले अर्ज, आवश्यक कागदपत्रांशिवाय अर्ज, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी आणि वैयक्तिक तक्रारी स्विकारल्या जाणार नाहीत.

या उपक्रमातून महिलांना न्याय मिळविण्याची सुविधा आणि शासनाशी थेट संवाद साधण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

# कीर्तनमालेने गणेश जयंती उत्सवाचा भक्तिरसात प्रारंभ

## ह.भ.प. अनुपमा देशकर यांचे कीर्तन

प्रतिनिधी १८ जानेवारी

**उमरखेड** : विदर्भ–मराठवाड्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या शहरातील चौभारा देवस्थान म्हणून प्रसिद्ध श्री रिद्धी–सिद्धी सहित मनोकामना पूर्ण करणाऱ्या श्री गणेश मंदिरात यंदाही गणेश जयंती उत्सव भक्तिभावाने साजरा करण्यात येणार आहे. दि. २२ ते २४ जानेवारीदरम्यान विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

**दि. २२ जानेवारी, गुरुवार**

उत्सवाची सुरुवात सकाळी काकडा आरतीने होणार असून त्यानंतर श्री गणपती अथर्वशीर्ष पठण होईल. सकाळी ९.३० वाजता मंदिर व्यवस्थापन प्रमुख सौ. संध्या देशमुख व दीपक देशमुख यांच्या हस्ते श्रींची महापूजा होऊन उत्सवाचा अधिकृत प्रारंभ होईल.

दुपारी श्री बसवेश्वर महिला भजनी मंडळाची भजनसेवा, तर रात्री ह.भ.प. सौ. अनुपमा देशकर यांचे सुश्राव्य हरिकीर्तन होणार आहे.

**दि. २३ जानेवारी, शुक्रवार**

सकाळची महापूजा सौ. माधुरी व श्री सुरेंद्र कोडगिरवार (अभियंता व नवनिर्वाचित नगरसेवक) यांच्या हस्ते संपन्न होईल.

दुपारी नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. तेजश्री संतोष जैन व सर्व नगरसेवकांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ वकील अ‍ॅड. विलासराव देवसरकर असतील. रात्री पुन्हा ह.भ.प. सौ. अनुपमा देशकर यांचे प्रेरणादायी हरिकीर्तन होणार आहे.

**दि. २४ जानेवारी, शनिवार**

उत्सवाच्या अंतिम दिवशी सकाळची महापूजा डॉ. सौ. वैदेही व डॉ. श्री विवेक रामचंद्र कुळकर्णी यांच्या हस्ते होईल. त्यानंतर ह.भ.प. श्री बाबुराव महाराज तेरकर यांचे संप्रदायिक काल्याचे कीर्तन, गोपालकाला, महाआरती व महाप्रसादाने तीन दिवसांच्या उत्सवाची सांगता होईल.

**विशेष आकर्षण**

■ उत्सवकाळात दररोज सकाळी श्री बसवेश्वर देवस्थानातून श्री गणपती मंदिरापर्यंत काकडा भजन दिंडी काढण्यात येणार आहे. या सर्व कार्यक्रमांचा लाभ भाविकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन आयोजन समितीने केले आहे.

# तीन दिवसीय चाचा नेहरु बालमहोत्सवाचे आयोजन

प्रतिनिधी १८ जानेवारी

**यवतमाळ** : अनाथ, निराधार, निराश्रित तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी चाचा नेहरू बालमहोत्सव २०२५-२६ चे आयोजन करण्यात आले आहे. हा बालमहोत्सव दि. १९ जानेवारी ते २१ जानेवारी या कालावधीत शासकीय मुलांचे बालगृह व निरीक्षणगृह तसेच पोलिस कवायत मैदान येथे आयोजित करण्यात येणार आहे.

सदर बालमहोत्सवाचे उद्घाटन दि. १९ जानेवारी रोजी शासकीय मुलांचे बालगृह व निरीक्षणगृह, यवतमाळ येथे होणार असून, यावेळी जिल्हाधिकारी, यवतमाळ, विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास, अमरावती विभाग, तसेच बाल कल्याण समितीचे अध्यक्ष व सदस्य आणि बाल न्याय मंडळ, हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या तीन दिवसीय बालमहोत्सवात मैदानी स्पर्धा, इनडोर गेम, सांस्कृतिक कार्यक्रम आदी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांसाठी सकारात्मक निर्णय घेणार

## औदुंबर ज्येष्ठ नागरिक मंडळातर्फे नगराध्यक्षा तेजश्री जैन यांचा सत्कार

प्रतिनिधी १८ जानेवारी

**उमरखेड** : ज्येष्ठ नागरिकांच्या अडचणी, समस्या व गरजांसाठी नगरपरिषदेमार्फत सकारात्मक व लोकहिताचे निर्णय घेतले जातील, तसेच त्यांच्या कल्याणासाठी आपण सदैव प्रयत्नशील राहू, असे प्रतिपादन नगराध्यक्ष तेजश्री जैन यांनी केले. तसेच औदुंबर ज्येष्ठ नागरिक मंडळाला सर्वतोपरी सहकार्य करु असे आश्वासन दिले.

डिसेंबर २०२५ मध्ये पार पडलेल्या उमरखेड नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत जनशक्ती पॅनलकडून नगराध्यक्षपदी निवडून आलेल्या तेजश्री अ‍ॅड. संतोष जैन यांनी भरघोस मतांनी दणदणीत



विजय मिळविला. तसेच २६ प्रभागांपैकी १८ प्रभागांत जनशक्ती पॅनलचे नगरसेवक निवडून आल्याने नगरपरिषदेत स्पष्ट बहुमतासह सत्ता स्थापन झाली.

या उल्लेखनीय यशाबद्दल औदुंबर ज्येष्ठ नागरिक मंडळ, उमरखेड यांच्या वतीने नवनिर्वाचित नगराध्यक्षा तेजश्री जैन व अ‍ॅड. संतोष जैन यांचा भव्य सत्कार सोहळा राम मंदिर परिसरातील विरंगुळा केंद्र येथे उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी औदुंबर ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष दिगंबर तवर होते. अध्यक्ष व प्रमुख मान्यवरांच्या हस्ते नगराध्यक्षा तेजश्री जैन व अ‍ॅड. संतोष जैन यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजीराव वानखेडे यांनी केले, तर आभारप्रदर्शन यशवंत गिरी यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी औदुंबर ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या संचालक व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पाया मजबूत असल्यावरच संघटना पुढे चालते

## अनंता गावंडे यांचे वक्तव्य

प्रतिनिधी १८ जानेवारी

**आर्णी** : आर्णी सायकलींग क्लबच्या आठव्या वर्धापनदिनानिमित्त महालक्ष्मी लॉन येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणात माजी जिल्हा परिषद सदस्य अनंता गावंडे बोलत होते. आर्णी सायकलींग क्लब आज आठ वर्षांचा झाला असून, यावरूनच या संघटनेचा पाया किती मजबूत आहे, हे दिसून येते, असे त्यांनी सांगितले.

"सायकल चालवा, फिट राहा" हा संदेश आर्णी सायकलींग क्लबने आठ वर्षांपूर्वी दिला. पाच मित्रांनी एकत्र येऊन या उपक्रमाची सुरुवात केली. कालांतराने विविध क्षेत्रातील व विविध वयोगटातील लोक या विचारांशी जोडले गेले. सायकलींगच्या माध्यमातून आरोग्याबाबत जनजागृती करताना वृक्षारोपण, प्लास्टिक वापर टाळून कापडी पिशव्यांचा वापर, पर्यावरणपूरक उपक्रम तसेच लांब पल्ल्याच्या सायकल राईड्स यांसारखे उपक्रम राबविण्यात आले. आज हा समूह पाच जणांपासून वाढत ७७ आरोग्यप्रेमी सदस्यांपर्यंत पोहोचला आहे. मी स्वतः त्या पाच मित्रांपैकी एक असल्याचा मला अभिमान आहे, असे गावंडे म्हणाले.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्षा नालंदा भरणे, पुसदचे मॅरेथॉनपटू अजय कोटलवार, यवतमाळ येथील नंदादीप फाउंडेशनचे अध्यक्ष संदीप शिंदे, सामाजिक कार्यकर्ते राजेश श्रीवास, आर्णी सायकलींग क्लबचे नवनिर्वाचित अध्यक्ष संतोष नालमवार, माजी अध्यक्ष संदीप ढोले उपस्थित होते. यावेळी आर्णी सायकलींग क्लबतर्फे



दिला जाणारा कार्यभूषण पुरस्कार यवतमाळच्या नंदादीप फाउंडेशनला प्रदान करण्यात आला. संदीप शिंदे व नंदनी शिंदे या दाम्पत्याने बेघर मनोरुग्णांच्या पुनर्वसनासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात आला. तसेच नगराध्यक्षा नालंदा भरणे, राजेश श्रीवास व अजय कोटलवार यांचा गौरव करण्यात आला. १४०० किलोमीटरची उदगिर–सोमनाथ–द्वारका सायकल यात्रा पूर्ण करणारे माजी अध्यक्ष प्रमोद बुटले, आर्णी ते पंढरपूर सायकल यात्रा करणारे सुनील जयस्वाल, सुनील राणे, अमोल देशमुख, सतीश पाचखंडे तसेच राज्यस्तरीय स्पर्धेत यश मिळवणारी १४ वर्षीय प्रिया पिसरवार हिचा सन्मान करण्यात आला. गायक आकाश अक्कावार, विजय राठोड, लक्ष्मण खाडे यांचाही गौरव झाला. महिलांसाठी घेण्यात आलेल्या खेळांत रेखा हरीश राठोड, तर वेळेवर उपस्थितीसाठी निशा कीरण चव्हाण यांना बहुमान देण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विठ्ठल देशमुख, सूत्रसंचालन प्रविण काळे यांनी केले, तर आभार हरिओमसिंह बघेल यांनी मानले. कार्यक्रमास क्लबचे सर्व सदस्य कुटुंबासह उपस्थित होते.

## कर्मचाऱ्याच्या चुकीमुळे शेतकरी अतिवृष्टीच्या मदतीपासून वंचित...



**शेलुबाजार :** २९. सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टी ने खरीप हंगामी पिकांचे वरिष्ठांचे आदेश असूनही तलाठी व मंडळ अधिकारी यांनी पंचनामे न केल्यामुळे चोरद व जनुना खुर्द शेतकऱ्यांना आर्थिक फटका.बसला आहे .शेलुबाजार मंडळातील चोरद व जनुना खुर्द हे दोन गावे तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या हलगर्जीपणा मुळे मदती पासून वंचित आहेत. मंगरूळनाथ तालुक्यातील चोरद सह परिसरात ता.२९ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीत खरीप हंगामातील सोयाबीन तुर कपास उडीद मुंग ज्वारी व भाजीपाला , फळबाग तसेच हळद आशा पिकांचे अतोनात नुकसान झाले. जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार मंगरूळनाथ तहसीलदार यांनीही संबंधित भागातील नुकसानग्रस्त भागातील शेती व पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करावेत व अहवाल सादर करावेत असे आदेश देण्यात आले होते , परंतु स्थानिक पातळीवर संबंधित कर्मचाऱ्यांनी त्या आदेशाला केराची टोपली दाखवत पंचनामे करण्यात हलगर्जीपणा केला त्या त्यांच्या नाकर्तेपणा चा फटका शेतकऱ्यांना बसला आहे.

## वाशीम जिल्ह्यात महसूल विभागात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार

# महसूल विभागातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर!

### जवळा येथील बनावट फेरफार प्रकरण पोहोचले महसूलमंत्र्यांपर्यंत * रिसोड तालुक्यासह जिल्ह्यातील महसूल विभागाची एसआयटी मार्फत चौकशी व्हावी

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

वाशीम वाशीम जिल्ह्यातील महसूल विभागात मागील ४/५ वर्षापासून मोठ्या प्रमाणात संगनमताने गैरप्रकार सुरु असल्याची चर्चा आहे. रिसोड तालुक्यातील जवळा येथील रमेश चाटे यांच्या गट क्र. ५/१ मधील १.१६ आर जमिनीचा फेरफार बनावट आदेशाने केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. असे गैरप्रकार फक्त रिसोड तालुक्यापुरते मर्यादित नसून वाशीम जिल्ह्यातील सर्व तालुक्यात खुलेआम सर्व अधिकाऱ्यांच्या संगनमताने असे गैरप्रकार सुरू असल्याची तहसिल,एसडीओ आणि जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात चर्चा सुरू असल्याचे समजते.

वाशीम जिल्ह्यातील महसूल प्रशासनातील सर्व कार्यालयातील मागील ४/५ वर्षात दिलेल्या सर्व प्रकरणाच्या निकालाच्या आदेशाची व त्या प्रकरणात दोन्ही पक्षाने सादर केलेल्या कागदपत्रांची महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनी एसआयटी मार्फत चौकशी करावी अशी मागणी रमेश चाटे यांनी केली आहे. रिसोड तालुक्यातील रमेश चाटे यांची वडीलोपार्जित व मालकी हक्काची जमिन गट क्र.५/१ मध्ये १.१६ आर आहे.ही जमिन तलाठी,मंडळ अधिकारी ,नायब तहसिलदार यांनी संगनमत करून,फेरफार करण्यासाठी बनावट आदेश तयार करून चाटे यांची जमिन हडपणाऱ्या जाधव यांचे नावाने करून दिल्याचा प्रकार रमेश चाटे यांनी उघडकीस आणला आहे. रमेश चाटे यांना या बनावट फेरफार प्रकरणाने मोठ्या प्रमाणात आर्थिक,मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करण्याची वेळ आली आहे.रमेश चाटे यांनी बनावट फेरफार प्रकरणात सहभागी असलेल्या सर्व दोषींविरूद्ध फौजदारी कारवाई होण्यासाठी मा.न्यायालयामध्ये प्रकरण दाखल केलेले आहे.तसेच बनावट आदेशाने झालेला फेरफार क्र. १२९९ रद्द करण्यासाठी एसडीओ यांचेकडे अपिल दाखल केलेले आहे.सद्यस्थितीत दोन्ही प्रकरणे न्यायप्रवीष्ठ असून रमेश चाटे व त्यांचे कुटुंब न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत,. रमेश चाटे यांनी त्यांचेवर झालेला अन्याय दुसऱ्या शेतकऱ्यावर होवू नये, महसूल विभागातील खुलेआम सुरू असलेला भ्रष्टाचार,गैरप्रकार कायमस्वरूपी बंद व्हावा, वाशीम जिल्ह्यातील रिसोड, मालेगाव, वाशीम, मंगरूळपिर,मानोरा आणि कारंजा लाड तहसिल मधील, वाशीम,मंगरूळपिर,कारंजा लाड येथील एसडीओ कार्यालयातील तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील मागील ४/५ वर्षातील सर्व प्रकरणाच्या निकालाच्या आदेशाची व संबंधित प्रकरणात दोन्ही पक्षाने सादर केलेल्या कागदपत्रांची एसआयटी मार्फत सखोल चौकशी करण्याची मागणीही रमेश चाटे यांनी राज्याचे महसूलमंत्री ना.बावनकुळे यांचेकडे केली आहे.रमेश चाटे यांच्या जमिनीचे बनावट फेरफार प्रकरण महसूल विभागातील सर्व भ्रष्ट चौकडीच्या अंगलट येणार असल्याने महसूल विभागात उलटसुलट चर्चा सुरू आहे.






## थोडक्यात

### पोलीस स्टेशन रिसोडची उल्लेखनीय कामगिरी

#### वयोवृद्ध महिलेची फसवणूक करून गळ्यातील सोन्याची पोथ लंपास करणारा आरोपी जेरबंद

• सिटी न्युज ब्युरो @ केनवड •

दिनांक ०५/०१/२०२६ रोजी फिर्यादी द्वारकाबाई किसन साबके (वय ८५), रा. ताकतोडा, ता. सेनगाव, जि. हिंगोली यांनी पोलीस स्टेशन रिसोड येथे तक्रार दिली. तक्रारीनुसार, रिसोड बसस्टँड येथे गावी जाण्यासाठी थांबलेल्या वयोवृद्ध महिलेचा एका अनोळखी व्यक्तीने विश्वास संपादन करून मोटारसायकलने गावी सोडण्याचा बहाणा केला. त्यानंतर तिला हिंगोली रोडवरील रतनगड येथे नेऊन 'डोळ्याला मधमाशी चावली' असा बनाव करत उपचारासाठी गळ्यातील सोन्याची पोथ काढण्यास सांगितले. पोथ न निघाल्याने आरोपीने ती किं.अ. ?३०,०००/- ची सोन्याची पोथ तोडून घेतली व महिलेला तेथेच सोडून पसार झाला.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ अंतर्गत कलम ३१८(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांच्या सूचनेनुसार डी. व्ही. पथकाने सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास व गुप्त बातमीदारांच्या माहितीच्या आधारे तपास करून दिनांक ११/०१/२०२५ रोजी आरोपी किसन श्रीरंग कदुर्गे (वय ३५), रा. कवरदडी, ता. सेनगाव, जि. हिंगोली यास ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून त्याच्याकडून सोन्याची पोथ (?३०,०००/-) जप्त करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवचरण डोंगरे करीत आहेत.ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक अनुज तारे (भ्इए), मा. अपर पोलीस अधीक्षक लत्ता फड, मा. सहायक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल (भ्इए), वाशिम यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवचरण डोंगरे, पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले, पोलीस अंमलदार रवि अढागळे, विनोद घनवट, परमेश्वर भोणे, रूपेश मस्के यांनी सहभाग नोंदविला.




# शेतकऱ्याला बुटाने मारहाणीचे अवलंबन, 'त्या' कृषी अधिकाऱ्याचे निलंबन!

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

रोजगार हमी योजने अंतर्गत फळबाग लागवडीच्या थकीत अनुदानाबाबत विचारणा करण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याला तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळे यांनी शिवीगाळ करून बुटाने मारहाण केली. या प्रकरणी शासनाने त्या अधिकाऱ्याला निलंबीत केले आहे.

महाराष्ट्र शासनाने वाशिम जिल्ह्याच्या मंगरूळपीर तालुक्याअंतर्गत असलेल्या गोगरी मध्ये मनरेगा अंतर्गत लागवड केलेल्या फळबागेची मजुरी मागील चार महिन्यांपासून रखडली होती. हे अनुदान मिळण्याच्या मागणीसाठी जिल्हा कृषी अधिकाऱ्यांकडे शेतकऱ्यांनी तक्रार केली होती.दरम्यान कृषी अधिकारी आज पाहणीसाठी आले असतांना एका शेतकऱ्याकडून कृषी अधिकाऱ्याचं पाहणी करतानाचा व्हिडिओ काढत होता. या तक्रारीचा राग मनात धरून व्हिडिओ का काढतो म्हणत थेट कृषी अधिकाऱ्याने शेतकऱ्याला मारहाण करून बूट उगारला आणि अश्लील शिवीगाळ सुद्धा करण्यात आली आहे.इतकेच नव्हे कृषी अधिकाऱ्याकडून शेतकऱ्याचं मोबाईल सुद्धा हिसकावण्यात आला आहे.या घटनेनंतर मारहाण करणाऱ्या तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळेवर महाराष्ट्र शासनाने निलंबनाची कारवाई केली आहे. व निलंबीत काळात मुख्यालयात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.



#### खेळातून ताणमुक्ती, संघभावना वृद्धिंगत: जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

# जिल्हा परिषदेच्या क्रीडा-सांस्कृतिक महोत्सव !

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित अधिकारी व कर्मचारी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचा शुभारंभ जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते जिल्हा क्रीडा संकुल येथे क्रीडा ज्योत पेटवून करण्यात आला.




त्यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी आकाश वर्मा, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे, मुख्या लेखा वित्त अधिकारी योगेश क्षीरसागर, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अजिंक्य वानखडे, शिक्षण अधिकारी संजय ससाने, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी धैर्यशील पाटील आदींची यावेळी उपस्थिती होती. 'कार्यक्रमाचे संचालन उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव आणि आदर्श शिक्षक डिगांबर घोडके यांनी केले.क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला.

उद्घाटन कार्यक्रम दरम्यान विविध संघाने विविध विषय घेऊन झाकी सादर केली होती. या झाकीने (सादरीकरणाने) सर्वांचे लक्ष वेधले होते.

कारंजा पंचायत समितीने 'पहलगाम येथील पर्यटकांवर झालेला दहशतवादी हल्ला' या विषयावर देखावा सादर केला.मुख्यालयाच्या टीमने छत्रपती शिवाजी महाराजांचे हिंदवी स्वराज्य तसेच शंभुराजे यांच्या शौर्यावर देखावा सादर केला. मालेगाव पंचायत समितीने आपल्या देखाव्याच्या माध्यमातून सिकल सेल या आजाराबाबत जनजागृती केली. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचे महत्व अधोरेखित करून याच थीमवर रिसोड पंचायत समितीने देखावा सादर केला.मानोरा पंचायत समितीने आपल्या देखाव्याच्या माध्यमातून पवरादेवी तीर्थक्षेत्र आणि मातृसत्ताक परंपरा व बंजारा संस्कृतीचे महत्त्व अधोरेखित करणारे दृश्य सादर केले. वाशिम पंचायत समितीने आपल्या सादरीकरणातून भारताच्या सीमेवर कर्तव्यावर शहीद झालेले जवान अमोल गोरे यांना श्रद्धांजली वाहिली.मंगरूळपीर पंचायत समितीच्या वतीने मात्र यावेळी कोणतेही सादरीकरण करण्यात आले नाही.

#### ध्येय, शिस्त आणि मेहनत यांची सांगड म्हणजे यशाचा मंत्र -जिल्हाधिकारी

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

विद्यार्थ्यांने प्रथम स्वतःचे ध्येय निश्चित करावे आणि त्यानुसार अभ्यासाची दिशा ठरवावी. केवळ अभ्यास नव्हे, तर नियोजनबद्ध तयारी महत्त्वाची असून वेळेचे योग्य व्यवस्थापन, विषयवार आणि नियमित पुनरावृत्ती यामुळेच यश साध्य होते.स्पष्ट उद्दिष्ट, योग्य नियोजन आणि सातत्यपूर्ण अभ्यास हाच यशाचा खरा मार्ग आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

पी.एम.श्री. जवाहर नवोदय विद्यालयास विद्यालय व्यवस्थापन समिती आढावा बैठकीच्या अनुषंगाने सदिच्छा भेट देत विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून जिल्हाधिकारी श्री .कुंभेजकर यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या भेटीदरम्यान त्यांनी विद्यालयाचा परिसर, प्रशासकीय कार्यालय, ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा, शिक्षक कक्ष तसेच संगणक कक्षाची पाहणी करून शैक्षणिक व भौतिक सुविधांचा सविस्तर आढावा घेतला.

# ...काळजाचा ठोका चुकवणारी शहादत!










**का**ही क्षण असे असतात, जे टाळ्यांच्या आवाजातही रडवतात आणि काही कथा अशा असतात, ज्या सांगताना शब्द आणि श्वासही थरथरतात.वाशिम जिल्हा परिषदेकडून आयोजित अधिकारी-कर्मचारी क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक महोत्सवाचा पहिला दिवस. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते स्पर्धांचा शुभारंभ झाला आणि लगेच विविध संघांच्या झाक्यांची मिरवणूक सुरू झाली. प्रत्येक झाकी आपापल्या विषयात रंगतदारष्ठ पण एक झाकी अशी होती, जिने अख्ख्या मैदानाचं हसू एका क्षणात गिळून टाकलं. गटविकास अधिकारी रवींद्र सोनोने यांच्या नेतृत्वात पंचायत समिती वाशिमच्या खेळाडूंनी सादर केलेली झाकी... शहीद जवान अमोल गोरे यांच्या बलिदानाची गाथा. यात सहभागी असलेल्या सर्व कलावंत कर्मचाऱ्यांनी अत्यंत जीव ओतून अभिनय सादर केला होता. झाकीच्या माध्यमातून दृश्य उभे राहते.सुट्टीवर गावी आलेला जवान. आई-वडिलांचा आधार आणि पत्नीच्या डोळ्यातला अभिमान. दोन चिमुकल्या निरागस मुलांचा बाप. त्यांचा काही दिवसांचा छोटा संसार... साधा, शांत, पण सोन्यासारखा.आणि मग अचानक कर्तव्याची हाक. कुटुंबाचा निरोप घेऊन... आपल्या आई-वडिलांच्या आठवणी, दोन गोड चिमुकल्या मुलांचे गोंडस हसू आणि पत्नीचा आतुरलेला चेहरा डोळ्यात साठवून जवान कर्तव्यावर निघून जातो.दृश्य बदलतं.टीव्ही स्क्रीनवर बातमी झळकते... 'देशाच्या सीमेवर झालेल्या चकमकीत वाशिमचा सुपुत्र अमोल गोरे शहीद.'क्षणात सगळे स्तब्ध होतात. तिरंग्यात ुंडाळलेली शवपेटी.आई-वडिलांचा आक्रोश. पत्नीचा धाय मोकलून फुटलेला जीव. शव पेटीतील बाबांना बघून 'आई बाबा का उठत नाहीत' अशी मुलांनी मारलेली आर्त हाक सगळ्यांच्याच काळजाला चिरून जाते. उपस्थितांच्या डोळ्यांच्या कडा ओलावतात. बंदुकीच्या फैरीत शहीद अमोल गोरे यांना अखेरची सलामी दिली जाते... झाकी संपते, मैदान टाळ्यांनी दुमदुमतं.पण तेवढ्यात अँकरचा आवाज काळजाचा ठोका चुकवतो.'आज ज्या शहीद अमोल गोरे यांच्या शौर्याला आदरांजली वाहण्यात आली, त्यांच्या पत्नी आणि दोन लहान मुलं इथे, या स्टेजवर उपस्थित आहेत.

'त्या क्षणी टाळ्या थांबतात, श्वास अडकतो,डोळे भरून येतात.ज्या वेदनेचा अभिनय पाहिला, ती वेदना प्रत्यक्ष समोर उभी असते.ती पत्नी, जिचं आयुष्य एका बातमीने बदललं.ती मुलं, ज्यांचं बालपण कायमचं पोरकं झालं. कार्यक्रमात उपस्थित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या हस्ते शहीद गोरे यांच्या पत्नी वैशाली अमोल गोरे दोन चिमुकले मुलं (अंदाजे पाच आणि सात वर्ष वयाची) यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

सत्कार स्वीकारताना वैशाली ताईंचा हुंदका आतच दाटला होता.कार्यक्रम संपला पण आठवणी काही संपत नाहीत...शहीद अमोल गोरे आज फक्त एका झाकीत नव्हते.ते प्रत्येक ओलावलेल्या डोळ्यात होते. प्रत्येक थरथरणाऱ्या टाळीत होते.ते प्रत्येकाच्या मनात एकच विचार सोडून गेले, 'देशासाठी शहीद होणं वीरतेचं शिखर आहे पण त्या वीराच्या कुटुंबासोबत उभं राहणं, ही खरी देशभक्ती आहे.'

**शब्दांकन : राम शृंगारे, वाशीम**



सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

रविवार, दि. १८ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# महापौर कोण होणार ? आरक्षणावर सर्वांची नजर

## सोमवारी निवडणूक अधिसूचना जारी होणार



प्रतिनिधी १८ जानेवारी

**अकोला:** महापालिका निवडणुकीसाठी मतदान आणि मतमोजणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. भारतीय जनता पक्षाने ३९ जागा जिंकल्याने त्यांची सत्ता येण्याची शक्यता आहे. परंतु विरोधी पक्षाकडे सुद्धा तेवढेच संख्याबळ असल्याने महापौर कोणाचा बसणार याबाबत सर्वांनाच उत्सुकता लागली आहे त्यामुळे अपक्ष आणि ज्या पक्षांचे एक ते दोन नगरसेवक निवडून आले आहेत त्यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. त्यामुळे महापौरपदाच्या आरक्षणाबाबत उत्सुकता वाढली आहे. राज्य सरकारचा नगरविकास विभाग अकोला सह राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी रोस्टर सिस्टीम वापरून महापौरपद आरक्षण प्रणाली जाहीर करणार आहे. राज्य सरकारने ही प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर पुढील आठवड्यात आरक्षण प्रक्रिया जाहीर होण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, सोमवार, १९ जानेवारी रोजी महानगरपालिकेचा निवडणूक कक्ष निवडून आलेल्या सदस्यांसाठी अधिसूचना (राजपत्र अधिसूचना) जारी करेल. महापौरपदाच्या आरक्षणाच्या घोषणेनंतर, महानगरपालिकेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत महापौर, उपमहापौर आणि स्थायी समिती अध्यक्षांसह १६ सदस्यांची निवड प्रक्रिया पार पडेल. शुक्रवारी मतमोजणीनंतर, महापालिकेच्या ८० नवनिर्वाचित सदस्यांना निवडणूक अधिकाऱ्यांकडून प्रमाणपत्रासह एक पत्र मिळाले. हे पत्र महापालिकेच्या समिती विभागामार्फत विभागीय आयुक्त कार्यालयात सादर केले जाईल. या पत्राच्या आधारे, सर्व पक्ष आपापले गट तयार करण्याची प्रक्रिया सुरू करतील. या प्रक्रियेनंतर, महापालिकेचा समिती विभाग पहिली सर्वसाधारण सभा आयोजित करण्याची प्रक्रिया सुरू करेल. भाजपचे ३९ सदस्य असल्याने त्यांना ४१ हा मॅजिक आकडा काढण्यासाठी फारसे कष्ट करावे लागणार नाहीत. कारण पूर्वाश्रमीचे आशिष पवित्रकार उषा विरक हे भाजपचेच असल्याने साहजिकच त्यांचा कल भाजपकडे राहील कारण राज्यात आणि केंद्रात भाजपाचे सरकार असल्याने महापालिकेत भाजपाची सत्ता आल्यास स्थिर सरकार बनून शहराचा व प्रभागाचा विकास होण्यास मदत होईल महापौर पदाचे आरक्षण कोणत्या प्रवर्गासाठी जाहीर होणार यावरच सत्तेची दिशा ठरणार आहे जर हे पद महिलांसाठी राखीव झाले तर सर्वच पक्षांमध्ये महिला नेतृत्वाची शोधाशोध सुरू होईल जर अनुसूचित जाती अनुसूचित जमाती किंवा मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षण आल्यास राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलण्याची शक्यता आहे शहरात सत्ता स्थापन करण्यासाठी भाजपा व विरोधी पक्षात सत्तेची रस्सीखेच चांगली चांगली आहे दुसरीकडे महापौर पदाच्या आरक्षणाची घोषणा झाल्यानंतर पुढील राजकीय हालचालींना वेग येईल त्यामुळे आता अकोला शहराचे राजकीय वातावरण तापले असून महापौर करून या प्रश्नाचे उत्तर मिळेपर्यंत चर्चांना पूर्णविराम मिळणार नाही हे मात्र नक्की..

## आलेगाव डोणगाव रस्त्यावरील खड्डे दुरूस्त करा

**आलेगाव :** आलेगाव डोणगाव रस्त्यावर जीवघेणे खड्डे पडले होते. त्या रस्त्यावरील खड्डे संबंधित प्रशासनाने नुकतेच खड्डे भरण्याचे काम केले. परंतु खड्डे निकृष्ठ केल्याचा आरोप होत आहे. रस्ता व्यवस्थित करण्यात यावा अशी मागणी केली जात आहे. मळसूर, राजगड, पांगरखेड, उंबरवडी, झरंडी, वसाली आदि खेडे गावांचे प्रवासी दळणवळण करीत असतात. तसेच रुग्णवाहिका नियमित रुग्ण घेऊन अकोला कडे फेऱ्या मारीत असते. आणि हा अतिरहदारीचा रस्ता पार उखडून गेल्याने सदर रस्त्यावर मोठ मोठे जीवघेणे खड्डे पडले, त्यामुळे वाहन चालक प्रवाशांना जिवमुठीत घेऊन प्रवास करण्याची वेळ आली.

# पंचायत वन योजनेचा फलक धूळ खात सामाजिक वनीकरण विभागाचे दुर्लक्ष

प्रतिनिधी १८ जानेवारी

**अकोला :** सामाजिक वनीकरण विभागाच्या अशोक वाटिका चौकातील कार्यालयाच्या परिसरात गेल्या अनेक महिन्यांपासून पंचायत वन या शासनाच्या योजनेचा फलक धुळखात पडला आहे.

हा फलक सामाजिक वनीकरणाने आपल्या नर्सरीत न लावता कार पार्किंगच्या शेडमध्ये ठेवला असून याकडे संबंधित अधिकारी डोळे झाक करीत आहेत. फलक सामाजिक वनीकरण विभागाच्या नर्सरीत लावण्याकरिता शासनाकडून निधीचा वापर करीत व्यर्थ खर्च केल्याचा आरोप होत असून



सामाजिक वनीकरण विभाग नेमकं काय करत आहे असा प्रश्न उपस्थित होत आहे. सामाजिक वनीकरण विभागाने यावर्षी झाडांची केलेल्या लागवडी बाबत सुद्धा सखोल चौकशी करणे हे गरजेचे असून जिल्हाधिकारी यावर कोणती कारवाई करणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचावी, योजनांचा उद्देश कळावा हा प्रमुख भाग असतो परंतु त्याकडे दुर्लक्ष दिसते. याकडे लक्ष देणे आवश्यक आहे अशी मागणी केली जात आहे.

# मतविभाजनाचा सर्वाधिक फटका भाजपालाच! गतनिवडणुकीच्या तुलनेत १० जागा घटल्या

प्रतिनिधी १८ जानेवारी

**अकोला :** महानगरपालिका निवडणुकीत सर्वच पक्षांना मतविभाजनाचा कमी अधिक फटका बसला असला तरी सर्वाधिक फटका हा भाजपा पक्षाला बसला आहे. २०१७ च्या निवडणुकीत भाजपला ४८ जागा मिळाल्या होत्या. मात्र या निवडणुकीत हिंदू मतांचे मोठ्या प्रमाणात विभाजन झाल्याने दहा जागा गमावण्याची वेळ भाजपावर आली आहे. अन्यथा भाजपा हा पक्षच 'सिकंदर' ठरला असता, अशी चर्चा जनमाणसात होत आहे.

प्रभाग क्रमांक २ क च्या जागेवर २५४ मतांनी भाजपचा पराभव झाला. त्याठिकाणी शिवसेना शिंदे गटाला ८२१ मते आहेत. प्रभाग २ डमध्ये ७८२ मतांनी भाजपची जागा पडली असून शिवसेना व अपक्षांना एक हजार ३२२ मते मिळाली. प्रभाग ४ ड मध्ये भाजप ५२० मतांनी पराभूत झाली असून शिवसेनेने १ हजार १८५ मते घेतली. प्रभाग ८ अ मध्ये भाजपला ३०२ मतांनी पराभव स्वीकारावा लागला, तर शिवसेना उबाठाने १ हजार २८३ मते घेतली. प्रभाग १७ ड मध्ये काँग्रेसने भाजपवर ७८७ मतांनी विजय मिळवला. त्या जागेवर शिवसेनेला २ हजार ५७६ मते आहेत. १२ ड जागेवर शिवसेना ठाकरे गटाने भाजपवर ३३२ मतांनी मात केली असून शिवसेना शिंदे गटाने १ हजार २२ मते घेतली. १८ अ मध्ये भाजपला ६२९ मतांनी पराभव झाला, तर शिवसेनेने १ हजार ७३३ मते घेतली. १६ बमध्ये भाजपवर राष्ट्रवादी शरद पवार गटाने ४६२ मतांनी विजय मिळवला. या ठिकाणी शिवसेनेला ३ हजार ७२३ मते मिळाली. २० ब मध्ये भाजपला शिवसेना ठाकरे गटाने १ हजार ५४१ मतांनी मात दिली, तर शिवसेनेला २ हजार ३५३ मते पडली. २० क मध्ये २३६ मतांनी भाजपचा पराभव झाला. त्या जागेवर भाजपतूनच शिवसेनेत गेलेल्या उमेदवाराने २ हजार ५२५ मते घेतली आहेत. जर हे मत विभाजन झाले नसते तर भाजपाच्या जागेत निश्चितच वाढ झाली असती. यावर आता भाजपाला आत्मचिंतन करण्याची गरज आहे.

## तिवसा व राजनखेडची सिईओंनी केली पाहणी

**बार्शीटाकळी :** तालुक्यातील तिवसाव राजन खेड श गावाला अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांनी १५ जानेवारीला भेट देऊन विविध कामाची पाहणी केली.

तिवसा व राजन खेड गावाला अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांनी दिनांक १५ जानेवारीला गावाला भेट देऊन मुख्यमंत्री समृद्धी पंचायतराज अभियान बाबत विचार विनिमय तथा विविध कामाची तसेच ग्रामपंचायत ची रेकॉर्ड पाहणी केली. यावेळी तिवसागावच्या सरपंच मंदाताई भारत बहादरे , राजन खेड चे सरपंच ईश्वर जाधव , पोलीस पाटील संदीप मनवर, ग्रामपंचायत कर्मचारी मनोज लुले, हरीओम नानोटे, प्रशांत लुले उपस्थित होते.

# वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करा; अन्यथा तीव्र आंदोलन

## शेतकरी संघटनेचे लक्ष्मीकांत कौठकर यांचा इशारा



प्रतिनिधी १८ जानेवारी

**अकोट:** तालुक्यासह परिसरात वन्यप्राण्यांनी उच्छाद मांडला आहे. शेती पिकांच्या नुकसानी सोबतच आता मानवी जीवनही संकटात आहे. वन्यप्राण्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे या परिसरातील नागरिकांमध्ये व शेतमजुरामध्ये भीतीचे वातावरण पसरले असून वनविभागाने याचा तातडीने बंदोबस्त करावा. अन्यथा आम्हाला रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडावे लागेल असा कडक इशारा शेतकरी संघटना विदर्भचे अध्यक्ष लक्ष्मीकांत कौठकर यांनी दिला आहे.

शहापूर येथील वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामध्ये जखमी झालेल्या हुसेन सुरतने व कुटुंबियाची नुकतीच भेट घेतली. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. वन कर्मचारी यांच्या विषयी तीव्र नाराजी व्यक्त केली. वन्यप्राण्यांच्या नियंत्रणाची जबाबदारी ही सर्वस्वी वनविभागाची आहे. मात्र विभाग याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत असल्याने शेतकऱ्यांच्या मालमत्तेचे आणि पाळीव प्राण्यांचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे वन विभागाने तात्काळ दखल घेऊन वन्य प्राण्यांचा २० जानेवारी पर्यंत कडक बंदोबस्त करावा असा अल्टीमेटम दिला आहे.

# देशमुख महिला मंडळाचा स्नेहमिलन सोहळा व हळदी कुंकू कार्यक्रम उत्साहात साजरा

## मकर संक्रांती निमित्त आयोजित कार्यक्रमाला महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती





प्रतिनिधी १८ जानेवारी

**अकोला:** देशमुख महिला मंडळाकडून मकर संक्रांतीचा आनंद अधिक द्विगुणित करण्याच्या उद्देशाने स्नेह मिलन सोहळा आणि हळदी कुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हॉटेल सेंटर प्लाझा मध्ये झालेल्या कार्यक्रमातून फक्त सण आला म्हणून गोड बोलू नका, चुकत असेल तर समजून सांगा. जमत नसेल तर अनुभव सांगा पण सणापुरत गोड न राहता आयुष्यभर गोड राहुया असा संदेश दिला. कार्यक्रमाला साजेशी सजावट केली होती.

शनिवार, १७ जानेवारी रोजी दुपारी झालेल्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या डॉ. पल्लवी थोरात, तहसीलदार गौरी मंगल यशवंत धायगुडे व डॉ. सुषमा देशमुख नागपूर ह्या होत्या. देशमुख महिला मंडळाच्या अध्यक्ष राजश्री देशमुख, उपाध्यक्ष नयना देशमुख, सचिव स्वप्नाली देशमुख, कोषाध्यक्ष प्रतिभा देशमुख, ज्येष्ठ सल्लागार कविताताई ढोरे, आरआरसी चॅनेलच्या संचालिका कल्पनाताई देशमुख तसेच सुहासिनीताई, चारुशीला धोत्रे, सिंधुताई मालोकर, यमुताई नळकांडे, जया बंड, शोभा पाटील, विद्या भरणे, सुलताताई, लताताई, अरूणाताई, डॉ. छायाताई आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. प्रमुख वक्त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रम, विविध प्रांतातील वेशभूषा करून नृत्य सादरीकरण, मजेशीर खेळ घेण्यात आले. तसेच विजेत्यांना आकर्षक बक्षिसे, आलेल्या सर्व महिलांना हळदीकुंकू, वाण देण्यात आले. तिळगुळाच्या वड्या वाटण्यात आल्या. सभागृहात सुबक रांगोळी काढली होत. तसेच आकर्षक सजावट केलेली होती. कार्यक्रमाचे संचालन संचालन श्वेता देशमुख व स्वप्ना देशमुख यांनी केले.

## शरद तुरकर प्राणघातक हल्ला प्रकरणी

# पाच मुख्य आरोपींसह अज्ञात तिघांवर गुन्हा दाखल!

प्रतिनिधी १८ जानेवारी

**अकोला:** अकोट फाइल मतदारसंघात भारतीय जनता पक्षाचे शरद तुरकर आणि नितीन राऊत यांनी एकाच पॅनलमधून निवडणूक लढवली. मतमोजणीनंतर शरद तुरकर विजयी झाले, तर नितीन राऊत यांचा पराभव झाला. शरद तुरकर यांनी अपेक्षेप्रमाणे पॅनलच्या अन्य उमेदवाराचा प्रचार न केल्याचा आरोप करत नितीन राऊत आणि त्यांच्या समर्थकांनी शरद तुरकर यांना त्यांचा सत्कार करायचा आहे असे सांगून त्यांच्या कार्यालयात बोलावले आणि नंतर त्यांच्यावर प्राणघातक शस्त्रांनी हल्ला केला. आणि अनेक वाहनांची तोडफोड केली. या घटनेमुळे परिसरात व्यापक दहशत निर्माण झाली, रहिवाशांनी दरवाजे कुलूप लावून स्वतःचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला. घटनेची माहिती मिळताच अकोट फाइल पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहोचले. परिस्थिती आणखी चिघळू नये म्हणून कडक पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.



गर्दी आक्रमक झाल्यावर पोलिसांना सौम्य बळाचा वापर करावा लागला. जखमी शरद तुरकर यांना तातडीने सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांनी या प्रकरणातील मुख्य आरोपी नितीन राऊत, लखन इंगळे, शेख सोहेल आणि आकाश पवार सूरज मुदगलवार आणि इतर दोन ते तीन अज्ञात आरोपींविरुद्ध भादंविच्या कलम ३०७ आणि ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निवडणूक निकालानंतर घडलेल्या या हिंसक घटनेने शहरातील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. अकोट फैल पोलिस विभाग या प्रकरणाची चौकशी करत आहे आणि सर्व हल्लेखोरांवर कठोर कारवाई करण्याचे संकेत देण्यात आले आहेत निवडणूक निकालानंतर घडलेल्या या हिंसक घटनेने शहरातील राजकीय वातावरण ढवळून निघाले असून लोकशाहीच्या उत्सवाला हिंसेचे गालबोट लागल्याची भावना व्यक्त होत आहे या प्रकरणातील आरोपी अद्यापही फरार असून पोलीस त्यांना अटक करण्याचा पुरेपूर प्रयत्न करीत आहेत

# दीप अँटीक म्युझियममध्ये आज भारतीय ज्ञान महोत्सव

प्रतिनिधी १८ जानेवारी

**अकोला:** अवनी ग्लोबल फाउंडेशन अकोला तर्फे भारतीय ज्ञान महोत्सव दीप अँटीक म्युझियम बाभूळगाव येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात भव्य बक्षीस वितरण समारोह खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, माजी आमदार श्रीकांत देशपांडे, उपशिक्षणाधिकारी प्रमोद टेकाडे, सुप्रसिद्ध उद्योजक नंद गणपती संग्रहालय प्रमुख प्रदीप नंद व दिपाली नंद यांच्या हस्ते या कार्यक्रमाचा शुभारंभ होईल. डॉ. दीपक नानोटी, पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, डॉ. अनिल फोकमारे यांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम होणार आहे. प्रा. सतीश फडके मार्गदर्शन करतील. हा कार्यक्रम १८ जानेवारी रविवार रोजी सकाळी दहा ते दुपार पर्यंत होणार आहे. या रंगारंग कार्यक्रम सांस्कृतिक आणि ज्ञानाला चालना देणारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेला हा उपक्रम अकोल्यात होत आहे. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे अशी विनंती अमृता सेनाड, डॉ. माधव देशमुख, कुशल सेनाड यांनी केली आहे. दीप पुरातन संग्रहालय यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम होत आहे.

# नाईक होमिओपॅथी येथे अनेक असाध्य आजारावर उपचार केले जातात!

## ॲडव्हान्स होमिओपॅथी उपचार रुग्णांसाठी गुणकारी

प्रतिनिधी १८ जानेवारी




**अकोला:** येथील नाईक होमिओपॅथी मध्ये थॉयरॉईड , लठ्ठपणा, ॲसीडीटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधीवात, मायग्रेन, पिसीओडी सारख्या असाध्य आजारावर उपचार करून रूग्णांना पुन्हा जीवन प्रवाहात आणण्याचे कौशल्य आहे. ॲडव्हॉन्स होमिओपॅथीच्या उपचाराने आजमितीस हजारो रूग्णांनी त्याचा लाभ घेतलेला आहे.

गेल्या ४० वर्षापासून नाईक होमिओपॅथी येथे शरीराच्या सर्व आजारावर सर्वांगीण यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रूग्णांना कुठेही फायदा झाला नाही. अश्या रूग्णांनी एकदा अवश्य भेट द्यावी अधिक माहिती मोबाईल क्र. ९१७५९५७१२९, ९१३००१६१२९ व Naikhomoeopathy.com (Youtube) वर माहिती घ्यावी. रुग्णांनी अनुभव कथन केले आहे. माझे नांव माधुरी, नाईक होमिओपॅथी येथे येण्या अगोदर माझे वजन खुप वाढले होते. खुप थकवा जाणवत होता. दम लागायचा येथे ॲडव्हॉन्सड् होमिओपॅथी उपचार सुरू केल्यानंतर एक महिन्यात माझे ३ किलो वजन कमी झाले. नाईक होमिओपॅथी उपचाराने मी समाधानी आहे.

## वीर गाथा प्रोजेक्ट ५.० मध्ये विधी वानखडेची निवड

**अकोला :** भारत सरकारच्या MyGov उपक्रमांतर्गत तसेच Ministry of Defence व Ministry of Education यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या वीर गाथा प्रोजेक्ट ५.० या राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित स्पर्धेत श्रीमती राधादेवी गोयनका विद्यामंदीर हायस्कूल, अकोला येथील विद्यार्थिनी कु. विधी प्रदीप वानखडे हिने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या स्पर्धेत देश-विदेशातून एकूण १.९२ कोटी विद्यार्थी सहभागी झाले होते. विशेष म्हणजे, १८ देशांतील CBSE संलग्न शाळांमधील विद्यार्थीही या स्पर्धेत सहभागी झाले होते.


CLASIFFIED

अकोल्यात आता नव्याने सुरु
द पाटील फ्रुड सेंटर चायनिज
येथे तुम्हाला सर्व प्रकारचे चायनिज, नुडल्स, मनचुरियन्स राईस लालीपॅप मिळेल. वेळः सायंकाळ ४ ते रात्री ११ वार्जपर्यंत होमडिलीवर उपलब्ध आणि प्राईज फक्त ७० रुपयापासून सुरू, मग सर्वांनीच एकदा जाऊन आनंद घ्या!
-: आमचा पत्ता :-
पाटील फ्रुड सेंटर
बारा जोतिलिंग रोड जवळ करोटे ज्वेलर्स जठारपेठ चौक, अकोला
प्रतिक हिंगणकर
Mo. 7378444488

JOB JOB JOB
सिर्फ Tally नही Real Accounting सिखो (100%) Practical Accounting Course Tally + GST + TDS + Income Tax 2-Days Free Seminar
Cont- Deepak Sir (कॉमर्सवाला)
9518319182



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK